The Department of Public Instruction, Bombay.

Miss. ARABELLA B. BUCKLEY'S

HISTORY OF ENGLAND

FOR

BEGINNERS,

TRANSLATED INTO MARÂTHI

BY

NÁRÁYAN VISHNU BÁPAT.

First Edition:—3000 Copies.

Registered for copy-right under the Government of India's Act XXV of 1867.

Bombay:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1892.

Price 2 Rupees.

BOMBAY:

PRINTED AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGAR" PRESS.

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

नवशिकांकरितां

इंग्लंडचा इतिहास.

मिस्स. आराबेला बी. बक्लि ह्यांच्या मूळ इंग्लिश ग्रंथाचें हें मराठी भाषांतर,

नारायण विष्णु बापट

ह्यांनीं केलें.

आवृत्ति पहिली ३,००० प्रती.

ह्या ग्रंथाची मालकी गव्हर्नमेंट ऑफ् इंडिया ह्यांच्या सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिली असे.

मुंबई:

गव्हर्नमेंट सेन्ट्रल बुक डिपो.

सन १८९२.

किंमत-२ रुपये.

मुंबईंत,
जावजी दादाजी ह्यांच्या "निर्णयसागर"
छापखान्यांत छापिला.

श्रीयुत,

अनेकोपपदमंडित, विद्वत्समाजभूषण,

नीतिसदाचारनिरत,

नामदार न्यायाधीश

काशीनाथ त्र्यंबक तेलंग,

मुंबई एथील युनिव्हर्सिटीचे व्हाइसचान्सेलर,

ह्यांना,

हा ग्रंथ,

फारादिवसांच्या स्नेहाचें स्मारक म्हणून,

परमादरानें अर्पण

केला असे.

ग्रंथकर्त्रीची प्रस्तावना.

ह्या लहान ग्रथांत मला जागा थोडी मिळाली; तेवढींत इंग्लंडाचा उदय, आणि विकास किंवा विस्तार, ह्यांचा सुसंबद्ध इतिहास तरुण वाचकांपुढें मांडण्याविषयीं मी यत्न केला आहे. ह्या इतिहासांत विद्यार्थ्यांना ज्यांची जरुरी लागणार अशा मुख्य घडलेल्या ऐतिहासिक गोष्टी तर कथन करवतील तितक्या कथन केल्या आहेत. शिवाय, आमच्या पूर्वजांची संसारयात्रा, अडचणी, आणि महत्कृत्ये किंवा पराक्रम, ह्यांचा टळटळीत चित्रपट रेखाटून दाखविण्याची मुख्यत्वें करून मी काळजी ठेवली आहे. त्या चित्रपटावरून, आमचे कायदे, आमच्या राज्यव्यवस्थेचें स्वरूप, आमचा व्यापार, आणि आमच्या वसविलेल्या राज्यशाखा, ह्यांचा उद्भव कसा झाला हें स्पष्ट दिसून येईल. ह्या संक्षिप्त इतिहासानें जर ह्याहून विशेष व्यापक अशा इतिहासांच्या अभ्यासाला मार्ग खुला होईल, आणि जर आतां जे अल्पवयस्क लोक वयानें वाढत जाऊन एका विस्तीर्ण साम्राज्यांतील नगरवासीजन बनत आहेत, त्यांना आमच्या राष्ट्रांतील लोकांच्या भूत, वर्तमान, आणि भावी, स्थितीविषयीं कळकळ उत्पन्न होईल, तर, ह्या संक्षिप्त इतिहासाचें सार्थक्य होईल.

शाळांतील शिक्षणांत, घडलेल्या ऐतिहासिक गोष्टी, आणि त्यांचे काल, विद्यार्थ्यांच्या स्मरणांत बद्धमूल झाले पाहिजेत ही गोष्ट आवश्यक आहे, म्हणून मीं **मेसर्स आर्क्‌ड** आणि **ब्यान्सम** ह्यांच्या **आउटलाईन्स** (आराखडा) नांवाच्या उत्कृष्ट ग्रंथाच्या साहाय्यानें ह्या इतिहासाच्या आरंभीं अनुक्रमणिका आहे तिची रचना अशी केलेली आहे, कीं, तींत प्रत्येक प्रकरणांतील ऐतिहासिक गोष्टींचा स्पष्ट गोश्वारा मिळावा, आणि ती अनुक्रमणिका, सर्व ऐतिहासिक गोष्टींचे काल एकामागून एक क्रमानें मिळतील, अशी कालानुक्रम—सूची व्हावी. ह्या इतिहासांत आणि कालानुक्रम—सूचींत अंक पुष्कळ आहेत त्यांत, पुष्कळ

काळजी ठेविली होती तथापि, कांहीं चुका अनिवार्य प्रकारानें राहिल्याच असतील. अशा चुका आढळून येतील तेव्हां त्या दुरुस्त झाल्या पाहिजेत म्हणून त्या जे कोणी मला कळवितील त्यांची मी उपकारी होईन.

अपकॉट आव्हेनेल हाइ आम्पटन १८८७.

भाषांतर कर्त्याची सूचना.

ह्या ग्रंथांत विशेषनामें अनेक आलीं आहेत. त्यांतील बहुतेकांचे उच्चार मेहरबान मि० **कर्कहम**, ए० इ० म० भा०, ह्यांनीं पसंत केले तसे लिहिलेले आहेत. कांहीं थोड्या विशेषनामांचे उच्चार, मयत **मेजर क्यांडी** ह्यांचा "भूगोलाचें वर्णन" ह्या नांवाचा ग्रंथ, व मि० **वेब्स्टर** ह्यांचा इंग्लिश भाषेचा कोश, ह्यांच्या आधारानें लिहिलेले आहेत; त्यांविषयीं जवाबदारी मजवर आहे. विशेषनामांच्या उच्चारांत राहिलेल्या चुका शेवटीं जोडलेल्या सूचींत बहुतेक शुद्ध केल्या आहेत.

मि० **कर्कहम** ह्यांनीं कृपा करून, आपला बहुत मोलाचा वेळ खर्च करून, मीं त्यांकडे वेळोवेळीं पाठविलेल्या उच्चारांच्या यादी तपासून दुरुस्त करून, मला साहाय्य केलें, हा मजवर त्यांचा भारी उपकार झाला. त्याविषयीं मीं आपली कृतज्ञता कितीही दर्शविली तरी थोडीच.

ह्या ग्रंथांत दोष किंवा चुका न राहव्या म्हणून मीं पुष्कळ प्रयत्न केला, तथापि त्यांत मार्मिक दृष्टीनें किंवा ढोबळ दृष्टीनेंही दोष किंवा चुका अशा निःसंशय अनेक राहिल्या असतील. त्या धुंडून काढून त्यांचें शुद्धिपत्र जोडणें आवश्यक होतें खरें. परंतु आधींच ग्रंथाची पृष्ठसंख्या ८५० जवळ जवळ होत आली आहे, तीमुळें किंमत जरब होईल. तशांत लांबलचक शुद्धिपत्र जोडलें तर पृष्ठसंख्या वाढून किंमतही कांहींशी त्या मानानें अधिकच होईल. ही गोष्ट मला

बरीशी वाटली नाहीं. दुसऱ्या आवृत्तीचा योग जमून येईल तर सर्वच ग्रंथ पुनः तपासून शुद्ध करण्याची सवड मिळेल. तेव्हां सर्व दोष नाहींसे करण्याविषयीं होईल तितका प्रयत्न करण्यांत येईल. तोंपर्यंत वाचकांनीं सदय अंतःकरणानें राहिलेल्या दोषांकडे अलक्ष्य करावें अशी त्यांना माझी सविनय प्रार्थना आहे.

माझी तादृश योग्यता नसतां मेहरबान मि॰ **च्याटूफील्ड**, डि॰ आ॰ प॰ इ॰ मुंबई, ह्यांनीं कृपा करून मला हें भाषांतर करण्याचें काम सांगितलें, हा त्यांचा मजवर परमावधीचा उपकार झाला. त्याचें मला चिरकाल कृतज्ञतापूर्वक स्मरण राहील.

मुंबई, तारीख ३०
माहे आक्टोबर
सन १८९२.

ना॰ वि॰ बा॰

अनुक्रमणिका

कालानुक्रमाप्रमाणें रचलेली इसवी सनाच्या सालांसहित.

टीप—ह्या अनुक्रमणिकेंत पृष्ठांक न देतां पृष्ठांच्या डोकीवर घातलेलीं सालें दिलेलीं आहेत, म्हणून तीवरून ग्रंथांतील कांहीं मजकूर पाहवयाचा असेल तर तो प्रत्येक पृष्ठाच्या डोकीवरील सालाच्या साह्याय्यानें पाहवा.

भाग १.

कदीम ब्रिटन आणि पुराणें इंग्लंड

प्रकरण १.

कदीम ब्रिटन

९७९ **एथेलरेड धि अन्रेडी**, ९७९–१०१६–त्याचे त्याच्या **थे-
न्सांशीं** कलह–दुसरी **डेन्स** लोकांची स्वारी, ९९१–**डेन-
गेल्ड** नांवाचा कर पहिल्यानें बसविला, ९९१–**डेन्सांची** क-
१००२ त्तल, १००२–**स्वेन** ह्यानें घेतलेला सूड–**एथेलरेड नार्म-
डीस** पळून जातो–राज्य **स्वेनाचा** पुत्र, **कूट**, आणि **एथे-
लरेडचा** पुत्र, **एड्मंड आयर्नसाइड**, ह्या उभयतांमध्यें वां-
टलें जातें–**एड्मंड** मरण पावतो–१०१६.

१०१७ **कूट धि डेन** ह्याला निवडून राजा नेमलें, १०१७–तो
इंग्लंड विभागून त्याच्या चार **अर्लडम्स** करतो–स्वस्थतेचीं
अठरा वर्षें, १०१६–१०३५–**कूटाचे** पुत्र, **हारल्ड**, १०३५,
आणि **हार्थाकूट**, १०४०, हे दोघे राज्य वाईट प्रकारें करतात
–**हार्थाकूट** ह्याच्या मृत्यूनंतर **इंग्लिश** लोक **एथेलरेडचा** पुत्र,
१०४२ **एड्वर्ड**, ह्याला माघारा बोलावतात, १०४२. पृष्ठें ३८–६०.

प्रकरण ४.

नार्मन्सांचें इंग्लंडांत वर्जन पडूं लागतें

१०४२ **एड्वर्ड धि कन्फेस्सर**, हा **एथेलरेड धि अन्रेडी**
आणि **नार्मंडीची एम्मा** ह्या दोघांचा पुत्र–**नार्मन्सांची** उ-
त्पत्ति आणि स्वभावधर्म–**एड्वर्ड** हा **नार्मन** बडे लोकांवर
कृपादृष्टि करतो–**वेसेक्सचा अर्ल गॉडवुइन** ह्याला न्यायर-
क्षणबाह्य केलें, १०५१–**नार्मंडीचा वुइलियम एड्वर्डाला**
१०५१ भेटावयास येतो, १०५१–**गॉडवुइन** हा परदेशीं गेला होता
तेथून माघारा येतो, आणि राजाच्या कृपेंतले **नार्मन्स**
फ्रान्सदेशीं पळून जातात, १०५२–**गॉडवुइनाचा** पुत्र,
१०५३ **हारल्ड**, हा **एड्वर्डाच्या** नांवानें राज्य चालवितो, १०५३–
वेल्स देशच्या राजाला सत्तेखालीं आणलें–**नार्थंब्रियां-
तील** बंड–**हारल्डाचा** भाऊ, **टास्टिग**, ह्याला न्यायरक्षण-

भाग २.

नार्मन्सांच्या विजयापासून मोठ्या चार्टरापर्यंत

प्रकरण ५.

नार्मन्सांच्या अमलाखालील इंग्लंड

ह्या नांवचें जंगल करण्यासाठीं **हांपृशायरां**तील जमीन ओस पाडतो–**कांटबरी**चा **आर्चबिशप, लान्फ्रांक,** हा चांगल्या प्रकारें राज्यकारभार करतो, परंतु परदेशीयांना बिशप्स नेमतो, १०७०–**वुइलियमा**चा वडील पुत्र **राबर्ट** हा बंड करतो, १०७८–**इंग्लंड**ची सर्वसाधारण पैमाशी–डूम्स-डे-बुक, १०८६–**वुइलियमा**चे क्लेश आणि **रुआंग** एथें त्याचा
१०८७ मृत्यु, तारीख ९ सेप्टेंबर १०८७–**राबर्ट** ह्याला **नार्मंडी** आणि **मेन** हे प्रांत मिळतात, आणि तिसरा पुत्र, **वुइलियम,** ह्याला **इंग्लंड**चा राजा निवडलें.

१०८७ **दुसरा वुइलियम** ह्याला **रूफस** हें उपपद होतें, त्याला **लान्फ्रांक** ह्यानें **वेस्टमिन्स्टर** एथें राज्याभिषेक केला, तारीख २६ सेप्टेंबर–तो शूर, परंतु बेकैद आणि व्यसनी होता–**बारन्स** लोक **राबर्टा**च्या तरफे बंड करतात, १०८८–**इंग्लिश** लोक राजाला पाठबळ देतात–**नार्मन्सां**चा **पेव्हन्सी**
१०८९ एथें पराभव होतो, १०८८–**लान्फ्रांक**चा मृत्यु, १०८९–**राल्फ फ्लांबार्ड** नांवाचा **जस्टिशियर** हा लोकांवर जुलूम करतो–**राबर्टा**विरुद्ध **नार्मंडींत** युद्ध, १०९०–**वेल्स**देशांत विजय–**कंबर्लंड** हा कौंटी राज्याला जोडला, १०९२–**स्काट्लंड**चा **माल्कम** हा **वुइलियमाला** आपला धनी मानून धन्याचा मानपान करतो–**आन्सेल्म**
१०९३ ह्याला **आर्चबिशप** केलें, १०९३, तेव्हां तो **वुइलियमा**च्या जुलमाचें आकलन करण्याविषयीं प्रयत्न करतो–**राबर्ट** हा **क्रूसेड्स**ला जातो, आणि **नार्मंडी वुइलियमा**कडे गहाण ठेवतो, १०९६–**आन्सेल्म** हा अधिकार सोडून **रोम**
१०९७ एथें सुखवस्तूसारखा राहवयास जातो, १०९७–**वुइलियम** हा पारध करीत असतां प्राणास मुकतो, तारीख २ आगस्ट ११००–**वुइलियम विजयी** ह्याचा चौथा पुत्र, **हेन्री,** हा गादी बळकावतो.

पहिला हेन्री ह्याला पसंत करून **राजा** केलें, आणि **वेस्टमिन्स्टर** एथें त्याला राज्याभिषेक केला, तारीख ११ आगस्ट ११००–तो विद्वान आणि सावध पुरुष होता–तो **इंग्लंडांत** जन्म पावलेला पहिलाच **नार्मन** राजा होय–तो प्रजेला अनेक गोष्टींच्या संबंधानें स्वातंत्र्य देणारा **चार्टर** देतो–तो **इंग्लिश** कुलांत उत्पन्न झालेल्या एका राजपुत्रीशीं विवाह करतो–**फ्लांबार्ड** ह्याला कैदेंत टाकतो–**राबर्टा**ला पेनशन देऊन शांत करतो–**फ्लेमिंग्स** लोकांची **पेंब्रोक** नांवाच्या कौंटींत वसाहत स्थापली, ११०५–**नार्मन** बारन्स **राबर्टा**करितां बंड करून उठतात–**टेन्शेब्राई**ची **लढाई**, ११०६–**राबर्टा**ला **इंग्लंडांत** कैदेंत टाकलें–**बिशप राजर** हा **जस्टिशियर** होतो, ११०७–तो पूर्वींचे रास्त कायदे पुनः चालू करतो–कोर्ट आफ् धि एक्सचेकर–**नार्मन्स** आणि **इंग्लिश** हे एकामेकांत मिसळून एक होतात–**हेन्री**चा मुलगा **वुइलियम** हा समुद्रांत बुडून मेला, ११२०–**हेन्री** बारन्सांकडून **माटिल्डा**शीं प्रजाधर्मानें वागूं अशी शपथ घेववितो–**पोपा**चा लेगेट (वकील) इंग्लंडांत घेतला, ११२५–**सिस्टर्शियन**पंथी **मंक्स् इंग्लंडांत** वस्ती करून राहतात, ११२८–**राबर्टा**च्या एकुलत्या एका पुत्राचा मृत्यु, ११२८–**राबर्टा**चा मृत्यु, ११३४–**हेन्री**चा मृत्यु, ११३५ . . . पृष्ठें ७६–१०६.

११००
११०६
११२०
११२५
११३५

प्रकरण ६.

स्टीफनच्या कारकीर्दीतील झोटिंग पादशाही

वुइलियम विजयी ह्याचा नातू, **स्टीफन**, हा गादी बळकावतो–तो लोकप्रिय परंतु क्षणिकबुद्धि होता–**लंडन**च्या लोकांनीं त्याचा चांगला आदरसत्कार केला–बारन्सांपैकीं कांहीं **माटिल्डा** हिला पाठबळ देतात–तिचा मामा, **स्कात्लंड**चा | ११३५

राजा **डेव्हिड**, ह्याचा **बाटल आफ् धि स्टान्डर्ड** ह्या ना-
११३८ वऱ्या लढाईत पराभव होतो, ११३८—**स्टीफन**, **अस्टिशि-
यर राजर** आणि इतर लोक ह्यांना पकडवून कैदेंत ठे-
११३९ वतो, ११३९—**माटिल्डा**, ही समुद्रावरून येऊन **इंग्लंडांत**
जमिनीवर उतरते, ११३९—यादवी किंवा आपआपसांतील युद्ध—
स्टीफन कैदी होतो, ११४१—**आक्सफर्ड**चा वेढा, ११४२—
११४७ **माटिल्डा इंग्लंड** सोडून जाते, ११४७—बारन्स लोक दे-
शाचा धुवा उडवितात—धर्माचें पुनरुज्जीवन—**कांटर्बरीचा आ-
र्चबिशप**, **थियोबाल्ड**, हा **स्टीफन** आणि **राजपुत्र
हेन्री** ह्यांच्या दरम्यान मध्यस्ती करतो—**वालिंग्फर्ड**चा तह,
११५३ ११५३—**स्टीफना**चा मृत्यु, तारीख २५ आक्टोबर, तो गादी
११५४ **हेन्री**ला मागें ठेवतो. . . . . पृष्ठें १०७—११२.

प्रकरण ७.

हेन्री प्लांटाजेनेट आणि त्याचे पुत्र

११५४ **पहिल्या हेन्री**चा नातू, **दुसरा हेन्री**, ह्याला **वेस्ट-
मिन्स्टर** एथें राज्याभिषेक होतो, तारीख १९ डिसेंबर—
तो खंबीर शाहणा राजा होता—तो एक चार्टर देतो—बारन्सांचे
किल्ले जमीनदोस्त करतो—न्यायाच्या कोडतांची पुनः स्थापना
करतो— सर्किटें (मंडळें), आणि जून्या, आणि लष्करी
नौकरीबद्दल स्कूटेज, स्थापतो—**टामस बेकेट** हा **चान्सेलर**
११६२ होतो, ११५४—त्याला **कांटर्बरीचा आर्चबिशप** केलें, ११६२
—तो न्यायाच्या कोडतांत धर्माधिकाऱ्यांची अपराधांबद्दल चौकशी
करण्याला आड येतो—**हेन्री** आणि **बेकेट** ह्यांचा कलह,
११६३ ११६३—**बेकेट फ्रान्सां**त पळून जातो, ११६४—**कान्स्टि-
ट्यूशन्स आफ् क्लारेन्डन** (क्लारेन्डन एथील राजशासनें),
११६६. ११६४—**क्लारेन्डन** एथील अस्साइझिस (कानू), ११६६,

आणि **नार्थहाम्टन** एथील अस्साइझिझ (कानू), ११६९-
आक्सफर्ड एथील विद्यार्थी-**बेकेट** हा परत येतो आणि
त्याचा दग्यानें खून, ११७०-**हेन्री**विरुद्ध सर्वांचा कट, ११७०
११७३-त्याचें प्रायश्चित्त, ११७४-तो, **स्काट्लंड**चा राजा,
बंडखोर बारन्स, आणि आपले पुत्र, ह्यांना जेरीस आणतो-
मिलिशिया स्थापली, ११८१-**हेन्री**चा मृत्यु, ११८९-**हेन्री** ११८१
आणि **जिफ्री** हे वारले होते त्यामुळें, **रिचर्ड**, हा तिसरा आ-
णि पाठीमागें राहिलेला सर्वांत वडील मुलगा, त्याच्या मागें गा- ११८९
दीवर बसतो.

पहिला रिचर्ड कूर डि लिऑं ह्याला सेप्टेंबरच्या ११८९
३ र्‍या तारिखेस राज्याभिषेक होतो-तो शूर आणि लोकप्रिय,
परंतु अंतःकरण आणि भाषा ह्या संबंधानें परदेशीय होता-त्यानें
विकवतील तितके सरकारी हुद्दे विकले, आणि डिसेंबर महि-
न्यांत क्रूसेड्सांकरितां **इंग्लंड** सोडून निघाला-त्याचा भाऊ
जान हा **इंग्लंडां**तून त्याला हुसकून देऊन आपण त्याच्या जागीं
राजा होण्याविषयीं प्रयत्न करतो-**लांगशां** हा **जस्टिशियर**
होता त्याला पदच्युत केलें, ११९१-**लंडन**चा **पहिला मेयर**,
११९१-**रिचर्डा**ला **आस्ट्रिया**च्या राजानें पकडून कैदकेलें, ११९१
११९२-त्याची सुटका करण्यासाठीं पांच प्रकारचे कर बसविले-
तो **इंग्लंडांत** येऊन चार महिने रहतो, ११९४, आणि नंतर ११९४
पुनः कधींही **इंग्लंडांत** आला नाहीं-**ह्यूबर्ट वाल्टर**, आणि
जिफ्री फिट्झ-पीटर, हे **जस्टिशियर्स** होतात-बिशप्स
हे गैरवाजवी करांना आड येतात-**शालूस** एथें तिराच्या जख- ११९९
मेनें **रिचर्डा**चा मृत्यु, तारीख ६ एप्रिल.

दुसऱ्या हेन्रीचा चौथा पुत्र, **जान** हा **इंग्लंडां**तील ११९९
गादीवर बसतो-तो रूपानें सुंदर परंतु स्वभावानें क्रूर आणि
विश्वासघातकी होता-तो **आन्जू** एथील गादीवर **जिफ्री**चा
मुलगा, **ब्रिट्नी**चा **आर्थर**, बसलेला होता त्याच्या विरुद्ध युद्ध

भाग ३.

पार्लमेंटाची उत्पत्ति

प्रकरण ८.

बारन्सांचें युद्ध

१२१६ **जानाचा पुत्र, तिसरा हेन्री**, हा नऊ वर्षाच्या वयाचा असतां, ह्याला **ग्लास्टर** एथें मुकुटाच्या ऐवजीं सोन्याचें एक

प्रकरण ९.

वेल्स आणि स्कॉट्लंड ह्यांच्याशीं झगडा

१२७२ **पहिला एड्वर्ड** हा शूर आणि शाहणा राजा होता-दोन
वर्षांचें राजप्रतिनिधिमंडल-**एड्वर्ड** परत येतो आणि त्याला
१२७४ राज्याभिषेक होतो, तारीख १२ आगष्ट १२७४-**जस्टिशियर**
हा हुद्दा कमी केला-**बर्नेल्** हा चान्सेलर होतो-हेपेनिझ आणि
फार्दिंग्स हीं नाणीं पहिल्यानें पाडलीं-**वेल्स**चा राजा **लूएलिन**
हा **एड्वर्डा**ला धन्याचा मानपान करण्यास नाकारतो-**वेल्स**-
१२७७ देश जिंकला, १२७७-१२८२-**इंग्लिश** जातीचा पहिला
प्रिन्स आफ् वेल्स, १३०१-न्यायसंबंधी कोर्टांची व्यवस्था
मार्टमेनचें स्टाट्यूट, १२७९-**कीपर्स आफ् धी पीस** (स्व-
स्थता राखणारे) हे अधिकारी नवीन नेमले, १२८५-**जूलों**-
१२९० कांना देशांतून घालवून दिलें, १२९०-**स्काट्लंडा**शीं झगडा-
स्काटलोकांना कोणीच राजा राहिला नाहीं, १२९०-**एड्वर्ड**
हा, लवाद ह्या नात्यानें, **जान बेलियल** ह्याला पसंत करतो,
१२९५ १२९२-**पहिलें भरपूर इंग्लिश पार्लमेंट**, १२९५-**ए-
ड्वर्ड** हा जबर कर बसवितो, आणि **पार्लमेंट** त्याच्याकडून त्या
मोबदला जबरीनें नवीन चार्टर्स करून घेतें, १२९७-**एड्वर्ड** हा
स्काट्लंडांतील कोर्टांवरील अपीलांची तपासणी किंवा चौक-
शी **इंग्लंडांत** झाली पाहिजे असा हुकूम करतो-**स्काट्लंडा**शीं
१२९६ युद्ध, १२९६-**वालेस** ह्याच्या हुकमतीखालीं झालेलें बंड,
१२९७ १२९७-**फालकर्क**ची लढाई, १२९८-**वालेस** ह्याला फांशीं
दिलें, १३०५-**राबर्ट ब्रूस** ह्याच्या हुकमतीखालीं झालेलें बंड,
१३०६ त्याला राजा करून राज्याभिषेक होतो, १३०६-**एड्वर्ड** हा
स्काट्लंडवर चाल करून जात असतां **बर्ग-आन्-सांडस**
नांवाच्या गांवीं मरण पावतो, तारीख ७ जूलई १३०७.

पहिल्या एड्वर्डाचा पुत्र, **दुसरा एड्वर्ड** हा नवळा, १३०७
हेकेखोर राजा होता, आणि तो त्याच्या मर्जीतल्या लोकांच्या
लगामींत होता—त्यानें **स्काच**लोकांशीं चाललेल्या युद्धाची हे-
ळसांड केली—**पीयर्स गाव्हेस्टन** ह्याचा अमल, १३०८—
लार्ड्स आर्डेनर्स ह्यांनीं त्याला हाकवून लावलें, १३१०— १३१०
तो परत येतो आणि त्याचा शिरच्छेद होतो, १३१२—**नाइट्स
टेम्प्लर्स** ह्या नांवाचा एक श्रीमान जोग्यांचा पंथ होता तो मो-
डला, १३०९—**बानकबर्न**ची लढाई, तींत **इंग्लिशां**चा परा-
भव होतो, १३१४—दुष्काळ आणि क्लेश, १३१५—**ह्यू लि डे- १३१४
स्पेन्सेर** ह्याचा अमल, १३२०—बारन्स लोक बंड करतात—
लांकास्टर ह्याचा शिरच्छेद होतो, १३२२—कामन्सांना (सा- १३२२
मान्य लोकांना) कायदे करण्याच्या कामांत अधिकाराचा अंश
मिळतो, १३२२—**एड्वर्डा**ची राणी **इसाबेला** ही **फ्रान्स**
देशाहून फौज आणते, १३२६—राजाला पदच्युत केलें, तारीख
७ जान्युअरी, आणि त्याला दग्यानें ठार मारलें, तारीख २१
सेप्टेंबर १३२७ . . . . . पृष्ठें १५९–१८५. १३२७

प्रकरण १०.

शंभर वर्षांचें युद्ध

दुसऱ्या एड्वर्डाचा पुत्र, **तिसरा एड्वर्ड**, हा पंधरा १३२७
वर्षांच्या वयाचा असतांच त्याला राज्याभिषेक होतो, तारीख २९
जान्युअरी १३२७—**राणी इसाबेला** आणि **मॉर्टिमर** ह्यांचा
अमल, १३२७–१३३०—**स्कार्ट्लंड**चें स्वातंत्र्य मान्य केलें,
१३२८—**मॉर्टिमर**चा अपकर्ष आणि मृत्यु, १३३०—**फ्रा- १३३०
न्सचा राजा गिपन** प्रांताचा अभिलाष करीत असून, **स्का-
ट्लंडांत** हात घालितो—**एड्वर्ड** हा **फ्रान्स**च्या गादीवर वा-
रसा सांगतो, १३३७—शंभर वर्षांच्या युद्धाला आरंभ होतो,

१३३८ १३३८–**स्लॉइ** नांवाच्या बंदराबाहेर अरमाराच्या लढाईत
जय होतो, १३४०–**क्रेसी**ची लढाई, १३४६–**ब्लाक प्रिन्स**
ह्याचा पराक्रम–**काले** शहर शरण येऊन हस्तगत होतें,१३४६–
आर्डर आफ् गार्टर स्थापला, १३४८–**इंग्लंडांत** घड-
लेल्या गोष्टींची हकीकत–बंदेलोकांची बंदेपणापासून मुक्तता,
आणि जमिनी कौलानें किंवा मक्तयानें देण्याची वहिवाट प-
डते–उद्योगधंदे वाढतात–सोन्याचीं नाणीं पहिल्यानें वापरांत
१३४४ येतात, १३४४–युद्धाकरितां राजाला द्रव्याची गरज पडूं ला-
गल्यामुळें **पार्लमेंटा**ला नवीन अधिकार किंवा सत्ता मिळते–
नेव्हिल्ल–क्रॉस्स एथील **स्काटां**चा पराभव, १३४६–
१३४८ **ब्लाक डेथ** (काळा मृत्यु) नांवाचा सांतीचा रोग, १३४८–
भांडवलवाले आणि मजूर ह्यांच्या दरम्यानचा झगडा–**स्टाटूट**
आफ् लेबरर्स, १३४९–**चॉसर** आणि **लांग्लांड** ह्यांच्या
ग्रंथांवरून लोकस्थितीचें दर्शन होतें तें–**वुइक्लिफ** हा सर्व लोकांत
उच्चनीच भाव नसावा, समता असावी असा उपदेश करतो–
प्रेम्युनायरचें पहिलें स्टाटूट, १३५३–**फ्रेंचां**शीं पुनः युद्ध सुरू
१३५५ होतें, १३५५–**पॉयटीर्झ**ची लढाई, १३५६–**ब्रेटिग्नी**चा तह,
१३६० १३६०–**किल्केनीचीं स्टाटुटें** (कायदे) ह्यांनीं **आयरि-**
१३६७ **शां**वर जुलूम होतो, १३६७–**फ्रान्स**देशांतील तिसरी मोहीम
१३७६ अरिष्टकारक होते, **फ्रान्सां**तील मुलूख गमावतो, १३७६–रा-
जाला उतरती कळा लागते–**गूड पार्लमेंट** हें प्रधानांवर दो-
षारोप करतें–**ब्लाक प्रिन्स**चा मृत्यु, १३७६–पहिली डोई-
पट्टी, १३७७–**तिसऱ्या एड्वर्डा**चा मृत्यु, तारीख २१
१३७७ जून १३७७.

१३७७ **दुसरा रिचर्ड, ब्लाक प्रिन्सचा** पुत्र, हा वयानें अ-
करा वर्षांचा असतांच, त्याला राज्याभिषेक झाला, तारीख १६
जूलई–तो शूर आणि खंबीर इच्छेचा पुरुष होता, "तो

अनिर्बंध सत्ता मिळून बिघडे तोंपर्यंत चांगला राजा होता—त्याचा चुलता, **गांटचा जान**, **लांकास्टरचा ड्यूक**, ह्याचें मोठें वजन पडतें—शेतकरी लोक डोईपट्टीबद्दल दांडगावा करतात, १३८१—**वाट टाइलर**, आणि **जान बॉल**—**रिचर्ड** लोकांचें सांत्वन करतो—**व्हिलनेज** हळूहळू नाहींसा होतो—**रिचर्ड** आणि त्याचे चुलते ह्यांच्या दरम्यानचा झगडा—अकरा असामींचें एक कौन्सिल नेमिलें जातें, तारीख १ ली डिसेंबर १३८६—**लार्ड्स अप्पेलन्ट** हे **मर्सिलेस्स पार्लमेंटां**त राजाच्या दोस्तांवर दोषारोप करून हल्ला करतात, १३८८—**रिचर्ड** हा राज्यकारभार आपल्या हातीं घेतो, १३८९—**प्रेम्युनायर**चा दुसरा कायदा, १३९३—**फ्रान्स**देशाशीं कांहीं मुदतीचा तह, १३९६—**रिचर्डा**नें घेतलेला सूड, १३९७—तो स्वतंत्र राजा बनतो—तो **नार्फक**, आणि **बालिंग्ब्रोक** ह्या उपनांवाचा **हेरिफोर्ड**चा आणि **लांकास्टर**चा **हेन्री**, ह्या दोघांना देशपार करतो—त्यांपैकीं **हेन्री** हा आपली वतनवाडी हक्कानें मागून घेण्याकरितां परत येतो—**रिचर्डा**चा अधःपात होऊन तो कैदेंत पडतो, १३९९—**बॉलिंग्ब्रोक** हा राजा झाला म्हणून जाहीर केलें, तारीख ३० सेप्टेंबर १३९९. पृष्ठें १८५–२१७.

	१३८१
	१३८६
	१३८८
	१३९७
	१३९९

भाग ४.

वार्स आफ् धि रोझिझ

प्रकरण ११.

लांकास्टरचें घराणें.

चौथा हेन्री लांकास्टरचा, हा **तिसऱ्या एड्वर्डा**चा नातू, आणि **गांटच्या जाना**चा पुत्र, होता—पुष्कळ संकटांखालीं १३९९

सांपडला असतांहीं तो समर्थ राजा होता–ऐशीं वर्षांपर्यंत गादी-वरील वारशाच्या संबंधानें झालेला घोटाळा–**इंग्लिश बडे लोक**
१४०० बंड करतात, १४००–**रिचर्डा**चा मृत्यु–**ओएन ग्लेन्डूर** हा **वेल्स**देशांत बंड करतो, १४००–**लाल्लुईस**लोकांचा छळ, १४०१–**हॉमिल्डन हिल्ल** एथें झालेली **स्काटां**शीं लढाई,
१४०२ १४०२–**पर्सिझ** आणि **ग्लेन्डूर** ह्यांचें मिळून बंड, १४०३–**श्रूस्बरी** एथील लढाई, १४०३–**माउब्रे** आणि **स्क्रोप** ह्यांचें बंड, १४०५–राजाला पडलेल्या अडचणींनीं **पार्लमेंटा**ला नवीन
१४०७ अधिकार मिळतो, १४०७–**गांटच्या जाना**चे पुत्र, **बोफर्ट्स** उपनावाचे, हे **चान्सेलर्स** होतात–**हेन्री**चा मृत्यु, तारीख २० मार्च १४१३.

१४१३ **पांचवा हेन्री** हा **लांकास्टर** घराण्यापैकीं असून **चौथ्या हेन्री**चा पुत्र होता–तो शूर शिपाई; आणि शाहणा राजनीतिविशारद पुरुष होता–त्यानें, **पार्लमेंटा**चीं पसार झालेली **बिल्लुस** ह्यांत फेरफार होऊं नये हा हक्क **पार्लमें-**
१४१४ **टा**ला दिला, १४१४–**एल्येन प्रायोरिझ** राजाला दिल्या, १४१४–लोकांची भरभराटीची स्थिति–**लॉल्लुईस** लोकांचें बंड, १४१४–हेन्री हा **फ्रान्स**देशाशी युद्ध पुनः उपस्थित करतो,
१४१५ १४१५–**हार्फ्लूर**चा वेढा, १४१५–**आजिन्कोर्ट**ची लढाई, १४१५–**रूआंग**चा वेढा, १४१८–**हेन्री** हा **फ्रान्स**देशच्या
१४२० राज्याचा राजप्रतिनिधि होतो, १४२०–**हेन्री**चा मृत्यु, १४२२.

१४२२ **सहावा हेन्री** हा **लांकास्टर** घराण्यापैकीं असून **पां-चव्या हेन्री**चा पुत्र होता, त्याचें वय दहा महिन्यांचें होतें–**बेड्फर्ड**चा **ड्यूक** हा राज्याचा संरक्षक होतो, तो **फ्रान्स-**देशांत चाललेल्या युद्धाला जातो–**ग्लास्टर**चा **ड्यूक** आणि **कार्डिनल बोफर्ट** हे स्वदेशीं आपआपसांत कलह करतात,
१४२५ १४२५–**पार्लमेंटा**चा अपकर्ष–**पार्लमेंट आफ् धि "बा-**

प्रकरण १२.

यार्कचें घराणें

चौथा एड्वर्ड हा **यार्क**च्या घराण्यापैकीं असून तो १४६१
तिसऱ्या एड्वर्डाचा निपणतू होता-तो शूर, आणि

लोकप्रिय, परंतु व्यसनी होता–**हेज्लिमूर** आणि **हेक्सहाम** एथील लढाया, १४६४–**वारिक**चा **अर्ल, धि किंग मेकर** (राजे करणारा), ह्याच्याशीं कलह–**एजकोट**ची
१४६९ लढाई, १४६९–**एड्वर्ड फ्लांडर्स** देशीं पळून जातो–**सहाव्या हेन्रीला** सहा महिने पुनः गादीवर बसविलें,
१४७१ १४७०–**एड्वर्ड** परत येतो, १४७१–**वारिक** हा **बार्नेट** एथें ठार मारला जातो, तारीख १४ एप्रिल १४७१–**ट्यूक्स्बरी**ची लढाई, तारीख ४ मे १४७१–**मार्गारेट**चा पराभव होऊन, तिचा पुत्र ठार मारला जातो–**सहाव्या हेन्री**चा मृत्यु–**मार्गारेट**ला कैदेंत ठेवले–लोकांच्या एका मध्यम वर्गाचा उदय–**एड्वर्ड** हा जुलुमी प्रकारानें अमल करतो–तो **बेनेव्होलेन्सिझ** उकळतो–**काक्स्टन** हा छापण्याची युक्ति
१४७६ प्रवृत्तींत आणतो, १४७६–**क्लारेन्स**चा **ड्यूक** ह्याला ठार मारविलें, १४७८–**एड्वर्डा**चा मृत्यु, तारीख ९ एप्रिल १४८३.

१४८३ **पांचवा एड्वर्ड** हा **चौथ्या एडवर्डा**चा पुत्र होता, त्याचें वय १३ वर्षांचे होतें–तो **लंडनां**त प्रवेश करतो, तारीख ४ मे १४८३–तीन महिने राज्य करतो, परंतु त्याला राज्याभिषेक कधींच झाला नाहीं–**ग्लास्टर**चा **ड्यूक रिचर्ड** हा **प्रोटेक्टर** होतो–तो, राजा, आणि त्याचा भाऊ, ह्या दोघांना
ता० ४ मे **टॉवरां**त ठेवतो–तो **लार्ड हेस्टिंग्स** ह्याला ठार मारविलें,
पासून तारीख १३ जून–तो त्या दोघां राजपुत्रांना लग्नाच्या स्त्रीपासून
ता० २५ झालेले नव्हेत असें ठरवतो–मुकुट किंवा गादी स्वीकारतो,
जून. तारीख २५ जून.

१४८३ **तिसरा रिचर्ड** हा **चौथ्या एड्वर्डा**चा भाऊ, त्याला राज्याभिषेक होतो, तारीख ६ जुलई–तो शूर परंतु क्रूर आणि विश्वासघातकी होता–त्या तरुण राजपुत्रांचा वध होतो–**रिचर्ड** हा राज्य चांगलें करतो–तो **कानसल्स** नेमण्याची वहिवाट

वंशजांना परंपरेनें मिळावी असा ठराव होतो—**लांबर्ट सिम्नेल**
१४८७ ह्याचें निष्फल बंड, १४८७—**स्टार चेंबर** नांवाचें **कोडत**
स्थापलें, १४८७—**पर्किन वार्बेक** ह्याचें बंड, १४९२—
१४९७—**पॉयनिंग्स**चा कायदा **आयर्लंडा**ला **इंग्लिश** कायदे
१४९४ लागू करतो, १४९४—राजा, **बेनेव्होलेन्सिझ, स्टाट्यूट**
आफ् लिव्हरिझ, ह्या दोहों साधनांनीं आणि ज्या वतनवा-
ड्यांसंबंधीं वाद पडला असेल त्या वतनवाड्या खासगीकडे घेऊन,
संपत्तीच्या राशी जमवितो—ह्या कामांत **एम्पूसन** आणि **डड्ले** हे
दोघे त्याचे कार्यसाधक होतात—तो **पार्लमेंटा**वांचून अमल करतो—
क्रिस्टॉफर कोलंबस, व्हास्को डि गामा, आणि **का-**
१४९८ **बट**, ह्यांचीं जलपर्यटणें किंवा सफरी, १४९२–१४९८—**वार्बेक**
आणि **वारिक**चा **अर्ल** ह्यांना देहांत शासन होतें, १४९९—
राजकीय विवाह—**आरागान**ची **काथरिन** हिच्याशीं **प्रिन्स**
१५०१ **आफ् वेल्स, आर्थर**, ह्याचें लग्न होतें, १५०१—तो मरण पा-
वतो, आणि त्याची विधवा ती **काथरिन** हिच्याशीं, **हेन्री** हा
आतां **प्रिन्स आफ् वेल्स** झाला, त्याचा विवाह व्हावयाचा
म्हणून वाग्निश्चय होतो—**प्रिन्सेस्स मार्गारेट** ही **स्काट्लं-**
१५०२ **ड**च्या **चौथ्या जेम्सा**शीं विवाह करते, १५०२; तिच्या वं-
शांत **स्काटां**ची **राणी, मेरी**, ही जन्मास येते—**नवीन**
विद्या इंग्लंडांत प्रचारांत येते—**सातव्या हेन्री**चा मृत्यु,
तारीख २१ एप्रिल १५०९.

१५०९ **आठवा हेन्री** हा, **सातव्या हेन्री**चा पुत्र, त्याच्या दे-
हांत **यार्क** आणि **लांकास्टर** हीं दोन्ही घराणीं एकवटलीं
होतीं—तो तोंडचा भला, लोकप्रिय, असून त्याच्यांत वकूब पु-
ष्कळ होता, परंतु तो स्वार्थी आणि असभ्य होता—तो **एम्पू-**
१५१० **सन** आणि **डड्ले** ह्यांना देहांत शासन करवितो—तो जहाजें
१५१२ आणि गोद्या बांधवितो—**ट्रिनिटि हौस** स्थापलें, १५१२—**व्होली**

१५४०—राजा **काथरिन हाउअर्ड** हिच्याशीं विवाह करतो, १५४०—तिचा शिरच्छेद होतो, १५४२—राजा **आयर्लंडचा राजा** हा किताब घेतो, १५४१—**स्काट्लंडचा पांचवा जेम्स इंग्लंडावर** हल्ला करतो—त्याचा **सॉल्वे मॉस्स** एथें
१५४२ पराभव होऊन तो मरण पावतो, १५४२—**मेरी स्काटांची राणी** हें त्याचें तान्हें मूल मागें राहतें—**हेन्री काथरिन पार** हिच्याशीं लग्न करतो, १५४३—**इंग्लिश** भाषेंत **लिटर्जि** चालू केली—नाणीं हीणकस केलीं जातात (३०४ थें पृष्ठ पहा)—**आक्ट आफ् सक्सेशन** ह्या नांवाच्या कायद्यानें **स्काटांची राणी मेरी** हिला एका बाजूस टाकलें—**हेन्रीचा**
१५४७ मृत्यु, तारीख २८ जान्युअरी १५४७. पृष्ठें २६६–३००.

प्रकरण १४.

प्राटेस्टंट आणि क्याथलिक ह्या दोहों धर्मांच्या दरम्यानचा झगडा

१५४७ **सहावा एड्वर्ड, जेन सीमर**चा पुत्र, हा वयानें दहा वर्षांचा होता—तो विचारी आणि अत्यंत धर्मशील होता—तो निश्चीचा **प्राटेस्टंट** होता—**समर्सेट**चा **ड्यूक प्रोटेक्टर** होतो—**पिंकीक्लो**ची लढाई, १५४७—**प्राटेस्टंट** धर्मसंबंधी सुधारणा—**इंग्लिश प्रेअर—बुक** आणि **आक्ट आफ् युनिफार्मिटि,**
१५४८ १५४८—जुन्या धर्मासाठीं **डेव्हनशायरांत** बंड, १५४९—
१५४९ **नार्फकशायरांत** शेतकरी लोकांचें बंड, १५४९—**वार्विक**चा **अर्ल** हा **प्रोटेक्टर** होतो—त्याला **नार्थंबरलंडचा ड्यूक** हा किताब दिला, १५५१—**समर्सेटाला** देहांत शासन केलें,
१५५२ १५५२—दुसरा **युनिफार्मिटी**चा आक्ट, १५५२—**सहाव्या एड्वर्डाचीं** ग्रामर—स्कूल्स स्थापलीं—तो तरुण राजा आपल्या

पश्चात् **लेडी जेन ग्रे** हिला गादीची अधिकारीण नेमतो–राजाचा मृत्यु, तारीख ६ जूलई, १५५३.

मेरी ही **आरागानच्या काथरिन**ची मुलगी–ती नेकीची, परंतु संकुचित मनाची आणि कडू स्वभावाची होती–**लेडी जेन ग्रे** ही राणी झाली म्हणून डांगोरा पिटला, तारीख १० जूलई–**मेरी** राणी झाली असा डांगोरा पिटला, तारीख १९ जूलई–**नार्थबर्लंड** ह्याला देहांत शासन केलें–**क्याथलिक** धर्म पुनः पूर्ववत् चालू केला,–**वायट**चें बंड–**लेडी जेन ग्रे** हिचा शिरच्छेद होतो, १५५४–**मेरी स्पेन**चा राजा **फिलिप** ह्याच्याशीं विवाह करते, जूलई १५५४–**कार्डिनल पोल, पोपाचा लेगेट,** ह्याला **कांटर्बरी**चा **आर्चबिशप** केलें–बडे लोक धर्माच्या खात्यासंबंधी जमिनी सोडून देण्याला नाकारितात–**प्राटेस्टंट्सां**चा छळ–**लाटिमर, रिड्ले,** आणि **क्रान्मर,** ह्यांना खांबाला बांधून जिवंत जाळलें, १५५५–१५५६–**फिलिप** हा, **फ्रान्सा**शीं त्याला युद्ध करावयाचें होतें, त्यांत **इंग्लंडा**ला ओढतो–**स्काट्लंडां**तील **लार्ड्स आफ् धि कांग्रिगेशन,** १५५७ (३२४ वें पृष्ठ पहा)–**काले** शहर गमावलें, १५५८–**मेरी**चा मृत्यु, तारीख १७ नोव्हेंबर १५५८.

पृष्ठें ३०१–३१७.

	१५५३
	१५५४
	१५५६
	१५५८

प्रकरण १५.

एलिझाबेथच्या अमलाखालील शांति आणि संवृद्धि

एलिझाबेथ ही **आन बुलिन**ची मुलगी–ती फुशारखोर दुराग्रही, परंतु शाहणी आणि प्रतापी, राणी होती, ती लोककल्याणाला वाहिलेली होती–**इंग्लंड**ची दुर्बल अवस्था, आणि १५५८

यूरोपांत **क्याथलिक्स** आणि **प्राटेस्टंट्स** ह्यांच्या दरम्यान
चाललेल्या झगड्यापासून भीति–**सेसिल** (हा पुढें **लार्ड बर्ली**
१५५९ हा किताब पावला) हा **सेक्रेटरी आफ् स्टेट** होतो–आक्ट
आफ् सुप्रेमसी–राणीचा कल अंतःकरणस्वातंत्र्य देण्याकडे
होतो–**स्काट्लंडां**तील **काल्व्हिनिस्ट्स** हे, **ग्वीझ**ची **मेरी**
राजप्रतिनिधीण होती तिच्याशीं कलह करतात, १५५९–**एडिं-**
१५६० **बरो**चा तह, जुलई १५६०–**मेरी, कुईन आफ् स्काट्स**
ही **स्काट्लंडांत** येऊन पोहोचते, १५६१–पहिला **इंग्लं-**
१५६२ **डां**तील भिकाऱ्यांविषयीं कानू स्थापित झाला, १५६२–
१६०१–शेतकी, व्यापार, आणि शिल्पानें पदार्थ तयार करण्याचे
कारखाने, ह्यांची संवृद्धि–सुखाची अभिवृद्धि–**ओथ आफ्**
१५६३ **आलिजियन्स** घेतली पाहिजे असा निर्बंध केला, १५६३–
एलिझाबेथची लग्न करण्याची इच्छा नव्हती–**शान ओ'**
नील ह्याचें **आयर्लंडां**तील बंड, १५६५–**स्काटां**ची **राणी**
मेरी डार्न्ले ह्याच्याशीं लग्न करते, १५६५–**रिझियो**
१५६६ ह्याचा खून, १५६६–**डार्न्ले**चा खून, १५६७–**मेरी इंग्लं-**
डास पळून जाते, आणि तेथें **एलिझाबेथ** तिला कैदेंत टा-
१५६८ कते, १५६८–**पार्लमेंट** बलवत्तर होत जातें–**नेदर्लंड्स** देशांत
बंड होतें, १५६८–**मेरी**करितां **इंग्लंड**च्या उत्तरेकडे कारस्थान
होतें, १५६९–**एलिझाबेथ**ला **पोप** बहिष्कार घालतो–
१५७१ **रिडॉल्फी**चे कारस्थान, १५७१–**सेन्ट बर्थोलोम्यू** नांवाची
कत्तल, १५७२–**इंग्लिश** लोक **नेदर्लंडर्स** लोकांना खुशकीनें
आणि समुद्रांतून कुमक करतात–नवीन देश शोधून [illegible]ण्या-
साठीं जलपर्यटणें किंवा सफरी, १५७६–१५८३–**फ्रॉबिशर,**
रालि, हॉकिन्स, ड्रेक–क्याथलिक पाद्रींचा समुदाय
१५७६ येतो, त्यांनी **एलिझाबेथ**विरुद्ध कारस्थानें केलीं, १५७६–
१५८३–**एलिझाबेथ**चे रक्षण करण्यासाठीं स्थापलेली मं-

भाग ६.

अनिर्बंध राजसत्ताक राज्यपद्धती-विरुद्ध झगडा

प्रकरण १६.

प्रिरॉगेटिव्ह आणि पार्लमेंट

राज्य करण्याला मला **डिव्हाइन राइट** आहे असें तो श्रद्धापूर्वक मानी, आणि त्यानें **इंग्लिश** लोकांना ओळखिलें न-
व्हतें-तीन पक्ष-**प्युरिटन-इंग्लिश चर्च-क्याथलिक्स-**
हाम्टन कोर्ट एथील धर्मविचाराकरितां सभा, १६०४-**स्का-**
टूलंड व **इंग्लंड** हीं दोन्ही मिळून एक संयुक्त राज्य कर-
१६०४ ण्याचा उद्दू निघतो, १६०४-पहिल्याच **पार्लमेंटा**शीं उत्पन्न
झालेले लढे, १६०४-१६१०-**गनपाउडर प्लॉट**, १६०५-
जेम्स जाहीरनामे लावतो आणि जकाती बसवितो-**ग्रेट कॉ-**
न्ट्राक्ट आणि **पार्लमेंटा**चें विसर्जन, १६१०-**आडल्ड**
१६१४ **पार्लमेंट**, १६१४-मर्जीतल्या लोकांचा अमल, १६१२-
१६२१-**समर्सेट-जार्ज व्हिलियर्स-सर वाल्टर राली-**
वर अनर्थ गुदरून त्याला देहांत शासन होतें, १६१६-
१६१८-तीस वर्षांचें युद्ध सुरू होतें, १६१९-**प्युरिटन्स**
लोक स्वदेशत्याग करून **अमेरिकेंत** राहवयास जातात,
१६२० १६२०-**स्पेन** देशच्या राजाच्या मुलीशीं **प्रिन्स चार्लस**
याच्या विवाहाचा घाट मोडतो, १६२३-बेकायदा पैसा उकळ-
१६२१ ण्याचा इलाज राजा करतो-**तिसरें पार्लमेंट**, १६२१-
१६२२-**पिम, हाम्पूडन, एलियट**, आणि **कोक-बे-**
कनावर दोषारोप होतो, १६२१-**पार्लमेंटा**चें विसर्जन होतें,
१६२२ १६२२-पहिलें सप्ताहिक वर्तमानपत्र, १६२२-**चौथें पार्लमेंट**,
१६२४-**हालंड** देशीं केलेली अनर्थकारक मोहीम, १६२५-
१६२५ **पहिल्या जेम्सा**चा मृत्यु, तारीख २७ मार्च १६२५.

पृष्ठें [illegible]२७५.

प्रकरण १७.

राजा आणि लोक

१६२५ **पहिला चार्लस** हा **पहिल्या जेम्सा**चा पुत्र-तो मं-

भीर आणि प्रौढ, परंतु दुराग्रही आणि कपटी होता—तो
फ्रान्स देशची **हेन्रिएट्टा** हिच्याशीं विवाह करतो—**पहिलें**
पार्लमेंट, तारीख १८ जून—"**टन्नेज** आणि **पाउन्डेज**"—
पार्लमेंटाचें विसर्जन होतें, तारीख १२ आगस्ट—**केडिझ**वर
केलेली अनर्थकारक स्वारी, आक्टोबर—दुसरें **पार्लमेंट**,
१६२६—**बकिंग्हम**वर दोषारोप होतो—**पार्लमेंटा**चें विसर्जन १६२६
होतें—**फ्रान्स** देशाशीं युद्ध, १६२७—राजा जुलुमानें उसनवार
म्हणून पैसा वसूल करतो—**बकिंग्हम**च्या हातून **ला रोशेल**
शहराची सुटका करणें होत नांहीं, १६२७—जुलुमानें कर्ज म्ह- १६२७
णून पैसा उकळण्याच्या वहिवाटीला अडथळा होतो—**पिटिशन**
आफ् राइट, १६२८—**बकिंग्हमाला** दग्यानें ठार मारलें, १६२८
१६२८—**लॉड** ह्याला **लंडनचा बिशप** केलें, १६२८—**पा-**
र्लमेंट राजाला जुमानीत नाहीं—बैदा होऊन **पार्लमेंटा**चें वि-
सर्जन होतें, १६२९—**वेन्टवर्थ** आणि **लॉड** ह्या दोघांचा अ- १६२९
मल—हजारों **प्यूरिटन्स** लोक स्वदेशत्याग करून **अमेरि-**
केंत राहवयास जातात, १६३०—१६३४—**एलियट** हा **टौ-** १६३०
अरांत मरण पावतो, १६३२—**वेन्टवर्थ**चा **आयर्लंडां**तील
अमल १६३३—१६३९—देशांतल्या देशांत टपालाचा कारखाना
स्थापित होतो, १६३५—**लॉड** ह्याला **आर्चबिशप** केलें,
१६३५—तो **प्यूरिटन्स** लोकांशीं कलह करतो—राजा **शिप्-**
मनी नांवाचा कर बसवितो, १६३४—१६३८—**हाम्प्डन** हा १६३४
त्या कराविरुद्ध अपील करतो—**प्रिन्न** आणि **बास्टवुइक** ह्यांस
दिले[illegible]ा, १६३७—**चार्लस** हा **स्काट** लोकांवर प्रा- १६३७
र्थना—[illegible] जबरीनें लादण्याविषयीं प्रयत्न करतो—**कावे-**
नांटर्स ह्यांचा पुनरुद्भव, १६३८—**वेन्टवर्थ** ह्याला आतां १६३८
लार्ड स्ट्राफर्ड हा किताब मिळालेला होता, त्याला **इंग्लं-**
डास माघारें बोलावलें—तो **आयरिश** फौज इंग्लंडांत घेऊन

प्रकरण १८.

वि कामन्वेल्थ

कामनवेल्थ किंवा **फ्री स्टेट** झालें असा डांगोरा पिटला, १६४९
तारीख १९ मे १६४९–**कामन्वेल्थां**तील प्रमुख, **क्रॉम्वेल,**
आइर्शॉ, फेरफाक्स, व्हेन–यूरोप तटस्थ राहतें–**ऐकॉन**
बासिलैके ह्या नांवाचें पुस्तक छापून प्रसिद्ध होतें–**स्काट्लंड**
आणि **आयर्लंड** हीं **दुसऱ्या चार्लसा**ला आपला राजा
केलें म्हणून डांगोरा पिटतात, १६४९–**प्रिन्स रूपर्ट** हा **इं-**
ग्लिश चानलमध्यें येतो–**क्रॉम्वेल्ल आयर्लंडां**त जातो,
१६४९–तो **ड्राघीडा** आणि **वेक्सफर्ड** ह्या दोहों शहरांना
वेढा घालून त्यांची नासाडी करतो–**दुसरा चार्लस स्काट्-**
लंडांत जाऊन पोहोंचतो, जून १६५०–**क्रॉम्वेल्ला**ची **स्का-** १६५०
ट्लंडांतील मोहीम, १६५०–**डन्बार**ची लढाई, तारीख ३
सेप्टेंबर १६५०–**दुसरा चार्लस** हा **इंग्लंडां**त कूच करून
जातो–**वूर्स्टर**ची लढाई, तारीख ३ सेप्टेंबर १६५१–**दुसरा** १६५१
चार्लस फ्रान्स देशीं पळून जातो, तारीख १६ आक्टोबर
१६५१–**कामन्वेल्थ यूरोपांतील राष्ट्रें मान्य करतात–**
नाव्हिगेशन आक्ट, आक्टोबर १६५१–**डच्च** लोकांशीं १६५१
युद्ध, १६५१–**व्हान ट्रॉम्प** हा **ब्लेक** ह्याचा पराभव करतो,
१६५२–**डच्च** लोकांचा पूर्ण पराभव, फेब्रुअरी १६५३–त्या १६५३
लोकसत्ताक राज्यांतील सरकारी कारभारांत गैरप्रकार–**पार्ल-**
मेंटचे सभासद सर्वसामान्य निवडणूक होऊन नवीन **पार्ल-**
मेंट भरविणें नाकारितात–**क्रॉम्वेल्ल** हा त्या सभासदांना घा-
लवून देऊन सभागृह रिकामें करतो, तारीख २० एप्रिल
१६५३–लष्करी अमल–**बेरबोनचें पार्लमेंट,** तारीख ४ जु-
लईपासून तारीख १६ डिसेंबरपर्यंत–**क्रॉम्वेल्ल** हा **प्रोटेक्टर**

होतो, तारीख १६ डिसेंबर १६५३—त्याचे **आर्डिनन्सिझ**—**हालंडा**शीं तह, १६५४—पहिल्या **पार्लमेंटा**ला पांच महिन्यांत
१६५५ फांटा मिळतो—**जमेका** बेट जिंकून हस्तगत केलें, १६५५—**मे-जर-जनरल्स** प्रांतांचे अधिकारी नेमून त्यांकडून करविलेला राज्यकारभार, १६५५—दुसरें **पार्लमेंट**, १६५६—**क्रॉम्वेल्** राजा हा किताब नाकारतो—**पार्लमेंटा**चें विसर्जन केलें, फेब्रु-
१६५८ अरी १६५८—**डून्स**ची लढाई, **डन्कर्क** जिंकून घेतलें—देश स्वस्थ परंतु असंतुष्ट होता—**क्रॉम्वेल्**चा मृत्यु, तारीख ३ सेप्टेंबर १६५८—**रिचर्ड क्रॉम्वेल्** हा दहा महिने **प्रोटेक्टर** होतो—**रम्प** ह्या नांवाचें **पार्लमेंट**चें पाठिमागचें शेष राहिलें होतें
१६५९ त्याला पाचारण करून पुनः बोलावलें, १६५९—अराजक किंवा झोटिंग पादशाही—**जनरल मंक** हा **लंडनांत** प्रवेश करतो, तारीख १ जान्युअरी १६६०—**लॉंग पार्लमेंटा**ची समाप्ति होते, तारीख १६ मार्च १६६०—**दुसरा चार्लस** हा **डो-व्हर** एथें समुद्रावरून येऊन जमिनीवर उतरतो, तारीख २५ मे, आणि त्याला पुनः राजा म्हणून गादीवर बसविलें, तारीख
१६६० २९ मे १६६०. . . . . पृष्ठें ४१२–४३७.

प्रकरण १९.

धि रेस्टोरेशन

१६६० **दुसरा चार्लस** हा **पहिल्या चार्लसा**चा पुत्र—तो थट्टेखोर, तीक्ष्णबुद्धि, सौम्य स्वभावाचा, आणि सा[illegible] परंतु स्वार्थी आणि आळशी होता—आपणाला हुसकून लावतील तर तसें कधींही जावयाचें नाहीं असा त्यानें निश्चय केला होता—**क्लारेन्डन** हा अग्रणी प्रधान होतो, १६६०—१६६७—**इन्डे-म्निटीचा आक्ट**, १६६०—**फ्युडल टेन्युर्स** मोडले, १६६४—

मेरी ह्यांचें लग्न, १६७७–चार्लसाला फ्रेंचांकडून पेनशन मि-
१६७८ ळतें–पोपिश प्लॉट, १६७८–निमेगेनचा तह, १६७८–डान्बी
१६७९ पदच्युत होतो, १६७९–यार्कचा ड्यूक, जेम्स, हा रोमन
क्याथलिक असल्यामुळें त्याला गादीवरून वर्ज
करण्यासाठीं झगडा, १६७९–१६८१–"हेबियस
कॉर्पस" आक्ट, १६७९–लार्ड शाफ्ट्स्बरी हा
मॉन्मथच्या ड्यूकाला गादीवर बसविण्यासाठीं त्याला पाठबळ
१६८१ देतो–पार्लमेंटाचें विसर्जन, १६८१–व्हिग आणि टोरी हीं
नांवें उत्पन्न होतात–आक्सफर्ड एथील पार्लमेंट, जुलमाची
दहशत पडते, १६८१–शाफ्ट्स्बरीचा पाडाव–पेन्न हा पे-
न्सिल्व्हानिया नांवाची वसाहत स्थापतो, १६८२–राइ
१६८३ हौस प्लॉट १६८३–रस्सेल आणि सिड्नी ह्यांना देहांत
शासन होतें–पासिव्ह ओबिडियन्स हें धर्मतत्व धर्माधि-
कारी शिकवूं लागतात–दुसऱ्या चार्लसाचा मृत्यु, तारीख
१६८५ ६ फेब्रुअरी १६८५. . . . . पृष्ठें ४३८–४६९.

प्रकरण २०.

राज्यक्रांति

१६८५ दुसरा जेम्स हा दुसऱ्या चार्लसाचा बंधु, त्याचे
उद्देश चांगले होते, परंतु तो दुराग्रही आणि असमंजस होता–
त्याला रोमन क्याथलिक धर्म पुनः स्थापावयाचा होता–तो
ऐच्छिक कृत्यें करतो–व्हिग पक्षाचे लोक मान्मथ हा प्रा-
टेस्टंट होता म्हणून, त्याला गादीवर दावा करण्यासाठीं बोलाव-
तात, १६८५–आर्गाइलचें स्काट्लंडांतील बंड फसतें, मे
१६८५–मान्मथ समुद्रावरून येऊन टान्टन एथें जमिनीवर
उतरतो, आणि तो राजा झाला म्हणून तेथें डांगोरा पिटला–त्याचा

सेज्जमूरच्या लढाईत पराभव होतो, जून १६८५–त्या **बंडा**-चा अति क्रूरपणानें **कर्क** ह्यानें, आणि न्यायाधीश **जेफ्रिझ** ह्यानें, **ब्लाडि असाइझिझ** ह्यांमध्यें, सूड उगविला, सेप्टेंबर १६८५–**जेम्स** हा **क्याथलिक**पंथी लोकांना लष्करी अ-मलदार नेमतो–**पार्लमेंट टेस्ट आक्ट** मोडल्याबद्दल तक-रार करतें, १६८५–**फ्रान्स** देशांत **नांट**चें **ईडिक्ट** रद्द केलें हें ऐकून **इंग्लिश** लोक भीतीने दचकतात–कवाखान्यांतील राजकारणांसंबंधी घटवटना–**जेम्सा**चें आंधळे धर्मम्वूळ–तो पाउअर आफ् डिस्पेन्सेशन आपणास आहे म्हणून दावा सांगतो–**क्याथलिक** पंथी लोकांना सरकारी हुद्यांवर नेमतो–**जेफ्रिझ** ह्याच्या प्रमुखतेखालीं एक **कोर्ट आफ् एक्लिझि-आस्टिकल कमिशन** स्थापतो, १६८६–**लंडन** शहराला १६८६
दवदबा घालण्यासाठीं फौज नजीक ठेवतो–तो **डेक्लरेशन आफ् इन्डल्जेन्स** प्रसिद्ध करतो, १६८७–**माग्डलेन** नांवा-च्या कालेजांतील **फेलोझ**ना हाकवून देतो, १६८७–राष्ट्रांतील १६८७
लोक गुप्तपणें **आरेन्ज**चा **वुइलियम** आणि **जेम्सा**ची कन्या, त्याची बायको **मेरी**, ह्यांकडे वळतात–**जेम्साला** पुत्र झाला त्या कारणानें **जेम्सा**च्या पश्चात् **प्राटेस्टंट** धर्मी राजा गादी-वर बसेल ही आशा नष्ट होते, १६८८–सातां बिशप्सांवर आ-रोप ठेवून चौकशी होते, त्याने लोकांना फार कोप चढतो, जून १६८८–**वुइलियम** समुद्रावरून येऊन जमिनीवर उतरतो, तारीख ५ नोव्हेंबर १६८८–**जेम्स** पळून जातो–दरम्यानचा १६८८
अराजकाचा काळ, डिसेंबर १६८८ पासून फेब्रुअरी १६८९ पर्यंत–**डेक्लरेशन आफ् राइट्स** तयार केलें, १६८९–**वुइ-** १६८९
लियम आणि **मेरी** ह्यांना राजा आणि राणी केलें म्हणून जाहीर केलें, तारीख १३ फेब्रुअरी १६८९.

वुइलियम आणि **मेरी** ह्या उभयतांना राज्याभिषेक झाला, तारीख ११ एप्रिल १६८९–**वुइलियम** हा स्वभावें कडवा १६८९

आणि लोकांना अप्रिय, परंतु चांगला राजा होता-**दुसरा जेम्स फ्रान्स** देशांतून समुद्र ओलांडून **आयर्लंडांत** येतो-**नान जूरर्स** आणि **जाकोबाइट्स** हे **वुइलियमा**पासून दूर किंवा अलग राहतात-**वुइलियम** आणि **मेरी** हीं राजा आणि राणी झालीं म्हणून **स्काट्लंडांत** डांगोरा पिटला, तारीख ११ एप्रिल-**डंडी**चें बंड-**किल्लीक्रान्की**ची लढाई ता-
१६८९ रीख २७ जूलई-**आयर्लंडां**तील यादवी किंवा आपआपसांतील युद्ध-**लंडन्डेरी**चा वेढा, आणि त्या शहरची वेढ्यापासून सुटका, एप्रिलपासून आगस्टपर्यंत १६८९-**जेम्स डब्लि-नां**त राज्य करतो-**इंग्लंडांत टालरेशन आक्ट** पसार झाला-दरसाल पैक्याची पुरवणूक **पार्लमेंटा**च्या संमतीनें होऊं लागते-**म्यूटिनी बिल्ल-वुइलियम** समुद्र ओलांडून **आयर्लंडांत**
१६९० जातो-**बॉइन**ची लढाई, तारीख १ जूलई १६९०-**जेम्सा**चा पराभव आणि **फ्रान्स** देशीं पलायन-**बीची हेड**ची लढाई, १६९०-**आयर्लंड** काबीज होतें-**लिमरिक्क**चा तह, १६९१-
१६९२ **ग्लेन्को** एथील कत्तल, १६९२ (४९९ वें पृष्ठ पहा)-**जेम्सा**चा दोस्त, **फ्रान्स**चा **लूइ**, ह्याच्याशीं लढण्यासाठीं **वुइलियम नेदर्लंड्स** देशीं जातो, १६९२-**वुइलियमा**च्या विरुद्ध फंदफितूर-**ला होग**च्या लढाईनें **फ्रेंचां**चें अरमार लंगडें होतें, १६९२-**मेरी ग्रीनिच** एथील **हास्पिटल** स्थापते-राष्ट्रीय कर्जाची उत्पत्ति, १६९२-**पार्टी गव्हर्नमेंटा**चा उदय, १६९३-**ब्यांक आफ् इंग्लंड** स्थापली, १६९४-**नवा**
१६९४ **ट्रायेनियल आक्ट**, १६९४-**राणी मेरी** हिचा मृत्यु,
१६९५ १६९४-मुद्रणस्वातंत्र्य, १६९५-राजद्रोहाच्या [illegible]विषयीं
१६९६ कायदा दुरुस्त केला-नवीं नाणीं, १६९६-खिडक्यांवर कर, १६९६-**वुइलियमा**ला दग्यानें ठार मारण्याची गुप्त मसलत,
१६९७ १६९६-**रिस्वुइका**चा तह, १६९७-फौज कमी केली-न्यायाधीशांना स्वतंत्र केलें, १७०१-**स्पेन**च्या गादीवर कोणीं बसावें

प्रकरण २१.

अखेरीची स्थूअर्ट-वंशीय

प्रकरण २३.

अमेरिकेंतील वसविलेल्या राज्यशाखांचें स्वातंत्र्य

ग्लंडच्या रेव्हेन्यू आक्टानें अमेरिकेंत संताप उत्पन्न
लार्ड नॉर्थ, होतो, १७६७–**वुइल्क्स** ह्याला **मिडलसेक्स**चा प्रतिनिधि
जान्युअरी निवडलें, १७६९–**पार्लमेंट** त्याला सभेंत घेण्याला नाकारितें,
१७७० आणि अन्यायानें त्याची सभासदाची जागा **कर्नल लट्रेल**
ह्याला देतें–**वुइल्क्स** हा **कामन्सांच्या** सभेचें वृत्त लिहि-
णारे वर्तमानपत्रांचे बातमीदार ह्यांची लढाई लढतो, १७७१–
लंडन शहर आणि **पार्लमेंट** ह्यांच्या दरम्यानचा कलह–
पार्लमेंटांत चालल्या कामाची हकीकत छापून प्रसिद्ध कर-
ण्याची वहिवाट पुढें तशीच चालते–अर्वाचीन काळचीं वर्त-
मानपत्रें.

अमेरिकेंत तळमळ वाढते, १७७०–चहावरील कर–चहा
१७७३ **बॉस्टन** एथील बंदरांत समुद्रांत लकटून दिला, १७७३–
अमेरिकेंतील पहिली कांग्रेस्स, १७७४–**कान्कॉर्ड** ए-
१७७५ थील चकमक, तारीख १९ एप्रिल, १७७५–**अमेरिकें**तील
कॉलोनिस्ट्स आणि **इंग्लंड** ह्यांच्या दरम्यान युद्ध सुरू
होतें–**बंकर्स हिल्ल** नांवाच्या टेंकडीवरील लढाई, मे १७७५–
जार्ज वाशिंग्टन हा **कमान्डर-इन-चीफ** होतो–**अमेरि-
कन्सां**च्या स्वातंत्र्याचें प्रकटीकरण किंवा जाहीरनामा, ता-
रीख ४ जूलई १७७६–**बर्गोइन** ह्याची फौज शरण जाते,
१७७७ आक्टोबर १७७७–**चाथम** ह्याचे सल्ला करण्याविषयींचे शेवटचे
प्रयत्न–त्याचा मृत्यु, १७७८–**जिब्राल्टर**चा वेढा, १७७९–
१७८२–सर्व **यूरोप इंग्लंडा**च्या विरुद्ध होतें–**ग्राट्टन** हा
आयर्लंडाकरितां परदेशीं अनिर्बंधप्रकारें माल पाठविण्याचा हक्क
१७८० मिळवितो, १७८०–तसाच **पॉयनिंग्स**चा कायदा रद्द कर-
रॉकिंग्हम, वितो, १७८२–**गॉर्डन** ह्यानें उपस्थित केलेले दंगे, १७८०–
मार्च **यॉर्कटाउन** एथें **इंग्लिश** फौज शत्रूला शरण जाते, आक्टो-
१७८२ बर १७८१–**लार्ड नॉर्थ** हा राजीनामा देतो, १७८२–**रॉ-**

प्रकरण २४.

फ्रान्स देशांतील राज्यक्रांति-नपोलियन आणि इंग्लंड

१७९३ ळाव्या लूईचा शिरच्छेद, १७९३–बर्क हा इंग्लंडाला
त्याजवर येणाऱ्या अरिष्टाविषयीं जागें करतो–फ्रान्स देशांतील
लोकसत्ताक राज्य आणि इंग्लंड ह्यांच्या दरम्यानचें युद्ध,
फेब्रुअरी १७९३–लार्ड हाउ ह्याचा अरमाराच्या लढाईत
जय, १७९४–फ्रेंच आम्स्टर्डम हें शहर आणि डच लो-
१७९५ कांचें अरमार हीं जिंकून घेतात, १७९५–इंग्लंड, केप आफ्
गूड होप, सिलोन, आणि मलाक्का, हीं हस्तगत कर-
तें, १७९५–त्या युद्धानें उत्पन्न झालेली इंग्लंडांतील वि-
पत्ति–पिट्ट ह्याला दहशत पडते–"हेबियस कॉर्पस" नां-
वाचा कायदा तकूब केला–हॉर्न, टूक, आणि इतर लोक
ह्यांची चौकशी–फ्रेंचांनीं आयर्लंडावर केलेली स्वारी फ-
सते, १७९६–फ्रेंच लोक तहाचीं कलमें मान्य करीत नाहींत,
१७९६ १७९६–सेन्ट व्हिन्सेन्ट एथील अरमाराची लढाई, फेब्रुअरी
१७९७–नोर एथील दर्यावरदी लोकांचा दंगा, माहे मे–का-
म्पर्डाउन एथील अरमारांच्या लढाईत मिळालेला जय, आ-
क्टोबर १७९७–नपोलियन बोनापार्ट हा समुद्र ओलांडून
ईजिप्ट देशांत जातो, १७९८–नेल्सन ह्याचा नाइल नदी-
१७९८ वरील जय, तारीख १ आगस्ट १७९८–आयरिश लोकांचें
१८०० बंड, १७९८–आयर्लंड आणि इंग्लंड ह्यांचा संयोग, १८००–
आडिंग्टन राजा क्याथलिक्सांचे हक्क मान्य करीना म्हणून पिट्ट हा
मे राजीनामा देतो, जान्युअरी १८०१–राजा थोडा वेळ पुनः वेडा
१८०१ होतो–अलेक्झांड्रिया आणि कोपन हेगन एथील जय,
१८०१–आमीनच्या तहानें फ्रान्सच्या लोकसत्ताक रा-
१८०२ ज्याशीं चाललेल्या युद्धाची समाप्ति होते, १८०२–सर आर्थर
वेल्लेस्ली हा मराठ्यांशीं दुसऱ्या युद्धांत गुंतलेला होता,
पिट्ट, १८०३ (६५४ वें पृष्ठ पहा)–इंग्लंड आणि नपोलियन
मे ह्यांच्या दरम्यानचें युद्ध, तो आतां फ्रान्सचा सार्वभौम राजा
१८०४ किंवा बादशाहा झालेला होता, १८०३–१८१५–नपोलि-

यन इंग्लंडावर स्वारी करण्याची दशहत घालतो, १८०५— | लार्ड ग्रे-
ट्राफल्गार एथील जय, **नेल्सन**चा मृत्यु, आक्टोबर | न्व्हिल्ल,
१८०५—**आस्टर्लिट्झ** एथील पराभव, डिसेंबर १८०५— | फेब्रुअरी
पिट्ट ह्याचा मृत्यु, जान्युअरी १८०६—**फॉक्स**चा मृत्यु, से- | १८०६
प्टेंबर १८०६—**नपोलियन हा जेना** एथें **प्रुशियन्सां**चा | पोर्टलंडचा
पराभव करतो, आणि **इंग्लिशांच्या** जहाजांविरुद्ध **बर्लिन** | ड्यूक,
एथील आज्ञापत्र प्रसिद्ध करतो, नोव्हेंबर १८०६—**गुला-** | मार्च
मांच्या व्यापाराची बंदी, १८०७—**नपोलियन पोर्टुगल** | १८०७
देशावर स्वारी करतो, १८०८—**पेनिन्शुलर वार** सुरू होते,
१८०८—**कोरन्ना** एथें मागें हटण्याचा प्रकार, १८०९—**सर** | १८०८
जान मूर ह्याचा मृत्यु—ताल्यावर येण्याची आशाच उरली | पर्सिव्हल,
नाहीं इतकें राजाला वेड लागतें, १८१०—**प्रिन्स आफ् वेल्स** | डिसेंबर
हा **राजप्रतिनिधि** होतो, १८११—**वेलिंग्टना**चे **स्पेन** | १८०९
देशांतील जय, १८०९—१८१३—**सिऊडाड रॉड्रीगो, बा-** | लार्ड लिव्ह-
डाजॉस, सालामान्का, १८१२—**व्हिट्टोरिया, पि-** | पूल,
रनीझची लढाई, **सेन्ट सेबास्चियन**, १८१३—**पर्सीव्हल** | जून
ह्याला गोळी घालून ठार मारलें, १८१२—**युनायटेड स्टेट्स** | १८१२
ह्यांच्याशीं युद्ध, १८१२—**रशियन्स** लोक **मास्को** शहराला
आग लावतात, आणि **फ्रेंच** लोकांना माघारें परतावें लागतें,
१८१२—साहाय्यसंकेती दोस्त विजयी होतात—**नपोलिय-**
नाला एल्बा एथें पाठविलें, तारीख २८ एप्रिल १८१४—
तो तेथून पळून येतो—**वाटर्लू**ची लढाई, १८१५—**पारिस**चा
तह, १८१५—**नपोलियन** ह्याला **सेन्ट हेलीना** बेटांत कैदेंत | १८१५
ठेवलें, तेथें तो मरण पावतो, १८२१—युद्धाचा परिणाम म्हणून
उत्पन्न झालेली विपत्ति—शेतकऱ्यांचा **कॉर्न-लॉ**, १८१५—
ग्यास वापरण्यांत येऊं लागतो, १८१६ (६९९ वें पृष्ठ पहा)—
दंगे, १८१६—**प्रिन्सेस्स शार्लोट्ट** आणि तिचें तान्हें मूल
ह्यांचा मृत्यु, १८१७—**मांचेस्टर** एथील कत्तल १८१९— | १८१७

प्रकरण २५.

आमच्या कालांतील इतिहास

चौथा वुइलियम, तिसऱ्या जार्जाचा दुसरा पुत्र, हा साधा, रंगेल दर्यावरदी होता—**फ्रान्स** देशीं दुसरी राज्यक्रांति झाल्यामुळें **इंग्लंड** अस्वस्थचित्त होतें, १८३०—**हस्किस्सन** हा **मांचेस्टर** एथील लोखंडी रस्ता सुरू करतांना ठार मेला, १८३०—**वेलिंग्टन** ह्याचा राजीनामा, नोव्हेंबर १८३०—**रिफार्म बिल्लस**; (१) तारीख १ मार्च; (२) सेप्टेंबर; (३) पसार होतें, तारीख १८ डिसेंबर १८३१—**कान्सर्व्हेटिव्ह** आणि **लिबरल** हे शब्द उत्पन्न होतात—**गुलामगिरीची मनाई करणारा कायदा** पसार होतो, तारीख ३० आगष्ट १८३३—कारखाने आणि लोकशिक्षण, ह्यांविषयीं कायदे पसार होतात, १८३३—नवा **पूअर-लॉ**, १८३४—**म्युनिसिपल रिफार्म**, १८३५—फेरफारांनीं विपत्ति उत्पन्न झाली—**कानडा** देशांतील बंड, १८३७ (७०६ वें पृष्ठ पहा)—**चौथा वुइलियम** ह्याचा मृत्यु, तारीख २० जून १८३७. . . . . पृष्ठें ६७२—७०४.

१८३०
लार्ड ग्रे, नोव्हेंबर १८३०
मेल्बर्न, जुलई १८३४
सर रॉबर्ट पील, डिसेंबर १८३४
मेल्बर्न, एप्रिल १८३५

प्रकरण २६.

इंग्लंड आणि त्याच्या वसविलेल्या राज्यशाखा

व्हिक्टोरिया, केंटच्या ड्यूकाची मुलगी, ही गादीवर बसली, तारीख २० जून १८३७—तिला राज्याभिषेक झाला, तारीख २८ जून १८३८—तिचा **प्रिन्स आल्बर्ट** ह्याशीं विवाह झाला, तारीख १० फेब्रुअरी १८४०—**हानोव्हरचें** राज्य **कंबर्लेंडचा ड्यूक** ह्याला जातें—**इलेक्ट्रिक टेलिग्राफ** कल्पनेनें बनविलें—**लार्ड डर्हम** ह्याला **कानडा** देशाचा **गव्हर्नर-जनरल** नेमून पाठविलें, १८३८—**चार्टिस्ट्स** लोकांचा उद्भव—**आन्टि-कॉर्न-लॉ-लीग**, १८३८—**पेनी पोस्ट**, १८३९—अफूच्या संबंधानें **चीन** देशाशीं युद्ध, १८३९—

मेल्बर्न, १८३७
१८३८
१८३९

भाग १.

कदीम ब्रिटन आणि पुराणें इंग्लंड

कदीम ब्रिटन

पहिल्यानें

प्राचीनपाषाणयुगांतील लोक.

त्यांच्यामागून

नवीनपाषाणयुगांतील लोक.

(हे बास्क किंवा इबेरियन वंशांतले)

त्यांच्यामागून

ब्रिटन्स लोक.

(हे केल्टिक वंशांतले)

ख्रि० पू० ५५ आणि ५४.

जुलियस सीझर ह्यानें ब्रिटनावर स्वारी केली.

इ० स० ४३
रोमन लोकांनीं ब्रिटन जिंकिलें.

इ० स० ४१०.
रोमन लोकांनीं शेवटीं ब्रिटन सोडून दिलें.

त्यांच्यामागून

आंग्लो-साक्सन लोक

ऊर्फ

इंग्लिश लोक.

(हे ट्युटॉनिक वंशांतले)

इ० स० ४४९
जूट नांवाचे लोक समुद्रांतून येऊन **केंट** प्रांतांत जमिनीवर उतरले.

इ० स० ४७७
सिस्सा नांवाच्या सरदाराच्या हुकमतीखालीं **साक्सन** लोक **ब्रिटनांत** येऊन जमिनीवर उतरले.

इ० स० ५४७
ब्रिटनांत आंगल्स लोकांच्या वसाहती किंवा ठाणीं होतात.

(३२ व्या पृष्ठावरील वंशावळ पहा.)

नवशिकांकरितां
इंग्लंडचा इतिहास

प्रकरण १.

कदीम ब्रिटन.

इंग्लंडच्या इतिहासाचा अभ्यास करूं लागण्यापूर्वी, **इंग्लंड** म्हटलें म्हणजे काय ?, ह्या गोष्टीविषयीं पहिल्यानें शोध केला पाहिजे. ह्या प्रश्नाचें उत्तर देणें पुष्कळ लोकांना जितकें सोपें आहे असें वाटेल, तितकें तें सोपें नाहीं. **ब्रिटिश आइल्स** (ब्रिटिशांचीं बेटें) ह्यांची राणी **महाराणी व्हिक्टोरिया** ह्यांचा किताब **'क्कीन ऑफ् धि युनायटेड किंग्डम ऑफ् ग्रेटब्रिटन आंड आयर्लंड'** (ग्रेटब्रिटन आणि आयर्लंड ह्या संयुक्त राज्याची राणी) हा आहे. ह्यावरून **आयर्लंड** हा देश **ग्रेटब्रिटनापासून** वेगळा आहे हें स्पष्ट होतें. तो देश वेगळा असण्याचें कारण, **आयर्लंड** हें एक स्वतंत्र बेट आहे. इतकेंच केवळ नव्हे, परंतु त्या देशाच्या एका मोठ्या भागांत **इंग्लिशांहून** वेगळ्या वंशाच्या लोकांची वस्ती आहे. त्यांची एक स्वतंत्र भाषा आहे. तिला **'गेलिक'** असें म्हणतात. ती ते अजून आपआपसांत वारंवार बोलतात. परंतु **ग्रेटब्रिटन** ह्या शब्दाची वाट

इंग्लंड शब्दाची व्याख्या.

आयर्लंड आणि स्काटलंड.

काय ?. हें सर्वच **इंग्लंड** होय काय ?. खचीत नाहीं, कारण **ग्रेट-ब्रिटनाचें** उत्तरार्ध हें **स्काटलंड** होय. तें सुमारें तीनशें वर्षांपूर्वी वेगळें राज्य होतें. त्या **स्काटलंडांतील लोलंडर्स** (सखल प्रदेशांत राहणारे) म्हणून जे लोक आहेत, ते आणि **इंग्लिश** हे एकाच वंशांतले आहेत खरे, तथापि त्याच देशांतील उत्तरेकडील मुलुखांत राहणारे **हाइलंडर्स** (पहाडांत राहणारे) म्हणून जे लोक आहेत, ते **गेलिक** भाषा बोलतात, आणि ते लोक, **आइरिश** ज्या वंशांतले आहेत त्याच वंशाच्या एका शाखेंतले आहेत. आतां राहिला काय तो **ग्रेटब्रिटनाचा** दक्षिण भाग, म्हणजे **नार्थंबरलंड** नांवाच्या प्रांतापासून **इंग्लिश चानल** (खाडी) पर्यंतचा प्रदेश.

वेल्स.

निदान हा तरी खचीत **इंग्लंड** होय ना ?. होय, परंतु, "**वेल्स** नांवाची जी **प्रिन्सिपालिटी** (मांडलिक राज्य) आहे ती आंत घेऊन," हे शब्द जोडले तर; कारण एथेंही त्या उक्त प्रदेशांतून पुनः एक मोठा तुकडा बाद केला पाहिजे. त्या तुकड्यांत जे लोक राहतात, त्यांची '**किम्रिक**' नांवाची एक वेगळीच भाषा आहे. ती, **आयर्लंड**, व **स्काटलंडांतील हाइलंड्स** (पहाडी प्रदेश), ह्यांतील भाषांशीं इतकी सारखी आहे कीं, तें सादृश्य, **वेल्श, आइरिश,** आणि **हाइलंडर्स,** हे तीनही लोक एकाच मूल वंशापासून पैदा झाले असावेत ही गोष्ट साबीत होण्याला बस आहे. तो मूल वंश आजपर्यंत **इंग्लिशांपासून** पुष्कळ अंशीं पृथक् राहिलेला आहे.

तेव्हां, निश्चीनेंच म्हटलें म्हणजे, **ग्रेटब्रिटन** ह्या नांवाच्या बेटाचा जो दक्षिणेकडील अर्धा भाग तेवढेंच काय तें **इंग्लंड** होय.

इंग्लंडचें क्षेत्रफळ.

त्याचें क्षेत्रफळ ५०९२२ चौरस मैल आहे. त्याचे विभागून ५२ **इंग्लिश** कौंटी (प्रांत)

केलेले आहेत. ह्या ५२ कौंटींतच **वेल्स** देशाचे १२ कौंटी सामील आहेत. त्यांचें क्षेत्रफल ७३९८ चौरस मैल आहे, आणि ते **इंग्लंड**च्या पश्चिमेकडील कुशींत कंवटाळलेले आहेत. आगगाडींतून लोखंडी सडकेनें १८ तासांत, **इंग्लंड**च्या अतिदक्षिण अग्रापासून, त्याची उत्तर मर्यादा **ट्वीड**नदीच्या कांठीं **बेरिक** नांवाचें शहर आहे तेथें संपते तेथपर्यंत, आणि त्याच्यापुढेंही **लोलंड स्काच** लोकांच्या **एडिंबरो** शहरापर्यंत जातां येतें. तसेंच, **इंग्लंड**च्या पूर्वपश्चिम अति रुंद भागांतून एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत आगगाडींतून आठ तासांत जातां येईल. तथापि हा लहान देश, ह्या भूगोलावर आतां पसरलेल्या कोट्यावधि **इंग्लिश** लोकांच्या पूर्वजांचें मूल उत्पत्तिस्थान आहे. आणि **इंग्लंड**चा इतिहास म्हणजे, ह्या प्रतापी लोकांचा अभ्युदय, त्यांचे झगडे, आणि चुका, त्यांचें अज्ञान आणि दुष्कृति ह्यांमुळें त्यांस भोगावे लागलेले क्लेश, आणि त्यांचा हिय्या, दीर्घप्रयत्न, व सहनशक्ति, ह्यांचीं त्यांस मिळालेलीं प्रतिफलें, ह्या सर्व गोष्टींचा इतिहास होय.

इंग्लंड हें नांव पडण्याच्या पूर्वीचें ब्रिटन.

आतां जर **इंग्लिश** लोक मुळापासूनच ह्या देशांत राहणारे असते, तर त्यांच्या चरित्राला आम्हीं एकदम आरंभ केला असता. परंतु ज्या लोकजातींना हालीं **वेल्श, आइरिश, हाइलंडर्स,** आणि **कार्निश** असें म्हणतात, त्या ह्या बेटांत निदान दोन हजार वर्षांपासून तरी वस्ती करून राहिलेल्या आहेत, हें, **ग्रीक** आणि अन्यदेशीय ग्रंथकारांच्या ग्रंथांतून त्यांच्याविषयीं आढळणाऱ्या विरल उल्लेखांवरून कळतें. त्यांतून कांहीं जाति तर, त्यांच्याविषयीं कांहीं लेखी वृत्त ज्या काळांतलें मिळतें, त्या काळाच्याही फार

पूर्वीपासून त्या देशांत वस्ती करून राहिलेल्या असाव्या, असा संभव दिसतो. परंतु **'आंगल्स'** ऊर्फ **'एंगल्स'** नांवाचे जे लोक, ते, **बाल्टिक** समुद्राच्या कांठच्या **आंगेल्न** नांवाच्या प्रदेशापासून समुद्र ओलांडून **ब्रिटनां**त आले, त्या गोष्टीला १५०० हून ज्यास्ती वर्षे झालेलीं नाहींत. त्या **आंगल्सांनीं, जूट,** व **साक्सन,** ह्या नांवांचे आपले साथी ह्यांस आपल्या बरोबर घेऊन येऊन, **ब्रिटना**चा दक्षिणेकडील अर्धभाग आपल्या हस्तगत केला, आणि त्याला त्यांनीं आपलें नांव दिलें. ह्यास्तव, **इंग्लंडा**विषयीं वर्णन करितां येण्यापूर्वीं, **इंग्लिश** लोक **ब्रिटनां**त आले तत्पूर्वींचा **ब्रिटन**चा इतिहास फार संक्षिप्त रीतीनें सांगितला पाहिजे.

. . . . . .

पालिओलिथिक (प्राचीन पाषाणयुगांतील लोक).

सांप्रतच्या काळाच्या फार पूर्वीं गुदरून गेलेल्या (किती पूर्वीं हें कोणी सांगूं शकत नाहीं) युगांत, ज्या देशांत हालींचे **इंग्लिश** लोक राहतात, तो देश अरण्यग्रस्त होता. त्याच्या वेगळाल्या भागांतील जंगलांतून व मैदानांतून सिंह, वाघ, अस्वलें, तरस, हत्ती, हिप्पोपाटेमाइ (जलघोटक), सांबरें, आणि रेन्डीयर (मृगविशेष), हे पशु भटकत असत. ते, हीं भूमि आमची असें मानूनच जणूं, त्या काळच्या रानटी माणसांशीं झगडत. तीं माणसें त्यांना, ओबडधोबड गारांच्या खशावशा अणकुचीदार केलेल्या हत्यारांनीं, त्यांच्यानें मारवेल त्या प्रकारांनीं मारीत. हा लिहिलेला प्रकार असाच असावा. ह्याला प्रमाण म्हटलें म्हणजे, हें कीं, अशा प्रकारें मारलेल्या त्या वन्यपशूंच्या मोडलेल्या हाडांबरोबर एकाच जागीं, तीं हत्यारें, इंग्लंडांतील अनेक प्रदेशांत जुनाट गुहांत व नद्यांच्या रेंवट पात्रांत सांपडतात. ह्याशिवाय, त्या गु-

ह्यांच्या तोंडीं जळलेल्या लांकडांचे कोळसे सांपडतात त्यांवरून, तेथें आगट्या पेटविलेल्या असाव्या असें अनुमान होतें. आम्हीं ह्या रानटी लोकांना 'पालिओलिथिक' अथवा 'प्राचीन पाषाणयुगांतील' लोक असें नांव दिलें आहे, आणि त्यांच्या विषयीं माहिती फारच थोडी मिळते.

निओलिथिक (नवीन पाषाणयुगांतील लोक).

ह्या लोकांच्या मागून पुढील युगांत जे लोक उद्भवले, ते चांगलीं हत्यारें करीत असत असें दिसतें. तीं हत्यारें अजून दगडाचींच, परंतु सुरेख घडलेलीं, आणि घोंटून फारच साफ सफाईदार केलेलीं असत. ह्या लोकांना 'निओलिथिक' अथवा 'नवीन पाषाणयुगांतील' लोक असें म्हणतात. ह्या 'नवीन पाषाणयुगांतील' लोकांच्या अस्थि, आणि अस्थिपंजर, हीं एकाच ठिकाणीं, दगडांच्या फार सफाईदार कुऱ्हाडी, परशु, तीरांचीं फळें, आणि हाडांच्या सुया व टांचण्या, ह्यांसमवेत **इंग्लंड, वेल्स, व आयर्लंड,** ह्या देशांच्या अनेक भागांत, प्रेतें पुरून त्यांवर रचलेल्या टेंकडांत किंवा खोल्यासारख्या विवरांत पुरलेलीं सांपडतात. त्यांबरोबरच कुत्रीं, डुकरें, मेंढरें, बैल, आणि शेरडें, ह्यांचीं हाडेंही सांपडतात, त्यांवरून ते लोक हे ग्राम्य पशु बाळगीत असावे असें दिसतें. शिवाय, त्या लोकांच्या हाडांबरोबर, धोबड मातीचीं भांडीं, आणि जवसाच्या, तागाच्या व काडाच्या विणलेल्या कापडाचे तुकडे, सांपडतात, त्यांवरून, ते लोक, मातीचीं भांडीं करणें, आणि विणणें, ह्या कला शिकूं लागले होते असें दिसतें.

ह्या लोकांच्या मस्तकांच्या कंवच्या, ज्या खुज्या, काळ्या कातडीच्या, कुरळकेशांच्या, लोकांना बास्क अथवा इबेरियन असें म्हणतात, त्यांच्या कंवच्या सारख्या लांबट व अरुंद असत. हे

इबेरियन लोक, स्पेन देशांतील कांहीं जंगली पहाडी प्रदेशांत अद्यापि आहेत, आणि ते जी भाषा बोलतात ती, यूरोपाच्या अति उत्तरेकडील प्रदेशांत जे फिन्स नांवाचे लोक आहेत त्यांना वगळून, बाकीच्या यूरोपांतील प्रत्येक राष्ट्रांतील लोकांच्या भाषेहून, अगदीं वेगळी आहे. ह्यावरून, ते 'निओलिथिक' लोक, व हे इबेरियन लोक, एकाच विस्तृत पसरलेल्या वंशांतले असावे असा तर्क करण्याला कारण आहे. मुख्य कारण म्हटलें तर हें कीं, ब्रिटनांत जसे, तसेच त्या इबेरियन लोकांच्या पूर्वजांचे अस्थिपंजर, स्पेन देशांत प्रेतें पुरून त्यांवर रचलेल्या टेंकडांतील विवरांत दगडांच्या सफाईदार हत्यारांसमवेत पुरलेले मिळतात. सांप्रतचे आइरिश, व वेल्श, ह्यांतील अति नीच वर्गांतल्या लोकांत एक प्रकारचे खुजे, काळे, लोक अजूनही आहेत. तें फार करून ह्याच प्राचीन वंशाचें शेष असावें असें दिसतें.

क्राम्लेक्स.

तेव्हां, गुरेंढोरें पाळणाऱ्या, मातीचीं ओबडधोबड भांडीं व दगडांचीं हत्यारें करणाऱ्या, आपल्या बायकापोरांसह गुहांत राहणाऱ्या, आणि न घडलेल्या प्रचंड पाषाणांच्या लांब खोल्यांसारख्या केलेल्या व वरून मातीनें आच्छादिलेल्या शवगर्तांत आपल्यांतील मेलेल्या माणसांस पुरणाऱ्या, त्या निओलिथिक लोकांची तसबीर मनापुढें आणणें कठीण नाहीं. त्या शवगर्तांवरील माती खणून काढली म्हणजे आंतले दगड निरे राहतात. त्या बांधणावळी ओबड मेजांसारख्या दिसतात, त्यांना 'क्राम्लेक्स' असें म्हणतात. पुष्कळ काळपर्यंत, त्या यज्ञवेदी आहेत असा लोकांना भ्रम होता. बुइल्टशायर नांवाच्या कौंटींतील साल्सबरी नांवाच्या मैदानांत स्टोन्हेन्ज नांवाच्या गांवाजवळ, व इतर ठिकाणीं, ज्या प्रचंड पाषाणांच्या वाटोळ्या बांधणावळी आहेत, त्या ह्या लोकांनींच बां-

घलेल्या असाव्या असा संभव दिसतो. कशा आणि कां हें मात्र अजून गूढ आहे.

. . . . . .

केल्ट्स.

असो, कालगतीनें, वाटोळ्या कंवच्यांचे दुसऱ्या एका जातीचे लोक ह्या लांबट मस्तकांच्या लोकांत मिसळूं लागले. ह्या वाटोळ्या मस्तकांच्या लोकांचे अस्थिपंजर, निव्वळ मातीच्या बांधलेल्या वाटोळ्या शवगर्तांत सांपडतात, आणि त्यांबरोबरच, दगडांचीं, व तांबें व कथील ह्यांपासून होणाऱ्या एका मिश्र धातूचीं, हत्यारें त्या शवगर्तांत सांपडतात. त्या पंचरसी हत्यारांवरून, धातूंचा उपयोग कसा करावा हें ते लोक शिकूं लागलेले असावे, असें दिसतें. अंमळ अलीकडील काळच्या शवगर्तांतून कित्येकांत, लोखंडाचीं बनविलेलीं हत्यारें देखील सांपडतात. पंचरस धातूहून लोखंड घडणें फारच कठीण आहे. ह्या काळाच्या सुमारास एका नवीन वंशांतले लोक ब्रिटनांत आले होते. त्यांनीं आपल्याबरोबर आपली वरिष्ठ प्रकारची उन्नति आणली. हे नवीन लोक केल्ट नांवाच्या वंशांतले होते. एक गोष्ट अंमळ अचंब्याचीशी वाटेल, परंतु सांगणें नाप्राप्त आहे, ती ही कीं, ह्या केल्ट लोकांचें मूल स्थान शोधून काढण्याला, ब्रिटनापासून सरळ पूर्वेकडे, फारकरून पर्शिया (इराण) ह्या देशाच्या नजीक, कोठें तरी गेलें पाहिजे. ह्या लोकांपैकीं कांहीं, लांबून देशांमागून देश ओलांडीत येऊन, ब्रिटनांत वस्ती करून राहिले. विद्वान लोक सांगतात कीं, प्राचीन काळीं इराणाच्या एका भागाला आर्य असें म्हणत; तेथील लोक ते आर्य लोक; आर्य शब्दाचा अर्थ श्रेष्ठ. ते आर्य लोक, ऐतिहासिक काळाच्या पूर्वी आपला पूर्वकालीन मूल देश सोडून दोन दिशांनीं निघाले. कांहीं पूर्वेकडील

देशांत, म्हणजे, **हिंदुस्तान** व **इराण** ह्यांत, व कांहीं पश्चिमेकडील देशांत, म्हणजे, सर्व **यूरोप**खंडभर पसरले. ह्या दोन्ही दिशांकडील उक्त देशांत त्यांच्या भाषेचा माग लावितां येतो. पश्चिमेकडे जातांना प्रथम ते कांहींसे त्या दिशेनें जाऊन घरेंदारें करून थिरावून राहिले. पुढें त्यांचा समुदाय फारच वाढला तेव्हां, पुनः देशांतर करण्याची प्रवृत्ति उत्पन्न होऊन, त्यांच्या टोळ्या अधिकाधिक पश्चिमेकडे जाऊन वस्ती करून राहूं लागल्या. शेवटीं कांहीं लोक, समुद्र ओलांडून, **ब्रिटनां**त शिरले, तेथील मूळच्या रहिवाश्यांस त्यांनीं जिंकलें, आणि ते त्या देशांत कार्इम वस्ती करून राहिले. तेथील मूळच्या खुजा आणि काळसर वर्णाच्या लोकांमध्यें, आपल्या शरिरांच्या लांबलचक अवयवांनीं आणि सुंदर केशांनीं ते वेगळेच दिसत असावेत.

ख्रि० पू० ६ व्या शतकांत फिनिशियन लोक प्रथम व्यापाराकरितां येऊं लागले.

ते **केल्ट** लोक ह्या **ब्रिटनां**त असतां, **ख्रिस्ता**च्या जन्माच्या सुमारें सहाशें वर्षे अगोदर, जिला त्याकाळीं **'पिलर्स ऑफ् हर्क्युलीस'** (हर्क्युलिसाचे स्तंभ) असें म्हणत अशी जी **जिब्राल्टर**ची सामुद्रधुनी, तींतून जेव्हां **फिनिशियन** लोक, **कार्नवाल** नांवाच्या कौंटीच्या नजीकच्या **सिली ऐल्स** नांवाच्या बेटांत, कथील खरेदी करून घेऊन जावें म्हणून व्यापाराकरितां जहाजें हकारून आले तेव्हां, त्या **केल्ट** लोकांविषयीं पहिल्यानें इतिहासांत माहिती मिळते. त्या **सिली** बेटांना **ग्रीक** ग्रंथकारांनीं **'कास्सिटेराइडिझ'** (म्हणजे कथिलाचीं बेटें) असें म्हटलेलें आहे. पुढें सुमारें शंभरवर्षांनीं **ग्रीक** लोक **मास्सिलिया** म्हणजे हालींचें **मार्सेल्स** एथून खुष्कीच्या मार्गानें **ब्रिटनां**त येऊं लागले, आणि त्या काळापासून त्या बेटाला **'आ-**

ल्बियन', आणि आयर्लंडाला 'आइएर्ने', अशीं नांवें पडलेलीं आढळतात. तसेंच, तीं दोन, व त्यांच्या भोंवतालचीं बेटें मिळून जो एक समुदाय, त्याला ब्रिटानिया, हें नांव पडलेलें आढळतें.

. . . . . .

जुलियस सीझर ख्रि० पू० ५५ व्या वर्षी आला.

एथें शेवटीं ब्रिटन हें नांव कसें पडलें हें कळतें. त्या नांवानें तो देश पुढें हळू हळू इतर राष्ट्रांस माहीत झाला. ह्यापुढें सुमारें तीनशें पन्नास वर्षांनीं, रोमन लोकांचा जुलियस सीझर नांवाचा प्रतापी सरदार, ख्रि० पू० ५५ व ५४ ह्यां वर्षी ब्रिटनावर मोहीम करण्यासाठीं आला. त्यावेळीं ब्रिटन्स लोक कोणा एका कास्सिव्हिलॉनस नांवाच्या प्रतापी सरदाराच्या आधिपत्याखालीं होते. त्यांचा त्यानें पराभव केला, आणि त्यांकडून, रोमच्या अधिपतीला आम्ही खंडणी देत जाऊं, असा त्यानें करार करून घेतला. त्याच वर्षी तो ब्रिटनांतून माघारा गेला. तेव्हांपासून पुढें आणखी एक शंभर वर्षेंपर्यंत ब्रिटन तेथील लोकांच्या स्वाधीन राहिलेलें होतें. त्यापुढें मात्र तें पुनः तसें कधींही राहिलें नाहीं.

ब्रिटनांतील लोकांचीं घरें.

हा काळ येई तों, ब्रिटनाच्या दक्षिणभागांतील लोकांची बरीच सुधारणा झालेली होती. रणांत लढण्याकरितां त्यांचे एक प्रकारचे रथ असत. ते, भाले, बरच्या, आणि परशु, ह्या हत्यारांनीं लढत, आणि कातळ्यांच्या, आणि डाहळ्यांच्या, टोपल्यांसारख्या विणून केलेल्या ढालींनीं आपला बचाव करीत. ते कापडाच्या पासोड्या, झुलया, किंवा रजया, आणि कफन्या पांघरीत, आणि सोन्याचीं व रुप्याचीं दंडभूषणें घालीत, आणि दगडांच्या पायावर

लांकडें व वेत ह्यांच्या एक एथें तर एक तेथें अशा बांधलेल्या झों-पड्यांत राहत. त्या लोकांच्या प्रत्येक जातीची युद्धप्रसंगीं आश्रयासाठीं एकएक **डिन्न** म्हणजे भिंतीनें किंवा उंच दरडीनें वेष्टिलेली गढी असे. ह्या गढ्यांपैकीं एक **लिन्न–डिन्न** (ह्याचा उच्चार लंडन, आणि अर्थ सरोवराच्या कांठचा किल्ला किंवा गढी) नांवाची गढी होती. तीच सांप्रतच्या **लंडन** नांवच्या मोठ्या शहराचा मूलारंभ अ-सावा असें दिसतें. ते धान्य उत्पन्न करीत, आणि खडकांतील खब-दडींत तें सांठवून ठेवीत. ते बुरूडकामाच्या होड्या किंवा नावा क-रीत, आणि झाडांचीं खोडें पोखरून त्यांचे पगार किंवा होडकीं करीत. त्या देशाच्या पोटांत किंवा आंतील भागांत राहणारे लोक समुद्र-कांठीं राहणाऱ्या लोकांहून अज्ञान असत. ते पशूंचीं कातडीं पां-घरीत, आणि मांस व दूध ह्यांवर उपजीविका करीत. त्यांहून उ-त्तरेकडे राहणारे तर, केवळ नग्न जंगली असून, भीति म्हणून त्यांच्या गांवींही नसे, व ते स्वभावानें दुष्ट व खुनशी असत.

ब्रिटन्स लोकांच्या धर्मांत कांहीं प्रकार भव्यपणाचा परंतु फार घोर किंवा भयानक होता. त्यांचे धर्मोपाध्ये **ड्रूइड्झ** नांवाचे असत. त्यांचीं कांहीं गुह्य तंत्रें होतीं, आणि ते पुरुष आणि बायका ह्यांना बळी देत असें म्हणतात. परंतु सर्व सामान्य लोक मुख्यत्वें सृ-ष्टपदार्थोपासक होते असें दिसतें. ते नद्या, अरण्यें, आणि पर्वत, ह्यांवर अधिष्ठात्रीं दैवतें आहेत असें मानून त्यांची उपासना करीत. ओक (वृक्षविशेष) नांवाचा वृक्ष त्यावर वाढणाऱ्या मिस्टलटो नांवाच्या बांडगुळासह, हें त्यांच्या देवतेचें एक सांकेतिक चिन्ह किंवा प्रतिमा होती, आणि ते उपासनेकरितां गुहांत आणि अरण्याच्या गडद भागांत एकत्र जमत

ड्रूइडांचा धर्म.

क्लॉडियस नांवाच्या बादशाहाच्या आधिपत्याखालीं **रोमन** लोक **ब्रिटनांत** इ० स० ४३ त दुसऱ्यानें आले, आणि त्यांनीं त्या बेटाचा दक्षिण भाग हस्तगत केला तेव्हां, **ब्रिटनांतील** लोकांची अहवाल वर सांगितल्या प्रकारची होती. **ब्रिटनांतील** लोक **रोमन** लोकांबरोबर बहुतवर्षे शूरपणानें झगडले, आणि त्यांनीं त्यांना जंगलांत व पाणथळरानांत गांठून उपद्रव देऊन फार जर्जर केलें. सात वर्षेपर्यंत, दोहों पक्षांतून कोणत्या पक्षाचा जय होईल ह्याविषयीं शंका होती. शेवटीं **ब्रिटिशांचा कराक्टेकस** नांवाचा प्रतापी सरदार किंवा राजा होता, त्याचा पराभव झाला, आणि त्याला धरून बंदिवान करून **रोम**शहरीं पाठविलें. ह्याप्रकारें **ब्रिटनांत रोमन** लोकांना एकवेळ पाय ठेवायास आधार मिळतांच, ते पुढें पुढें चाल करून जाऊं लागले. शेवटीं आणखी थोड्या वर्षांत, ते **आंगल्सी** नांवाच्या बेटाला जाऊन थडकले. त्या बेटाला त्याकाळीं **मोना** असें म्हणत असत. तें बेट **ड्रूइड्स** लोकांचें कडेकोट बंदोबस्ताचें आश्रयाचें स्थान होतें. तेथें पावतांच **रोमनांनीं** त्या **ड्रूइड** लोकांची कत्तल उडविली. परंतु इतक्यांत **रोमनांनीं ब्रिटनांतील** काबीज केलेला सर्व मुलूख एकदम त्यांच्या हातांतून अगदीं गमावल्यासारखाच झाला; कारण, **ब्रिटिशांच्या** एका राजाची **बोआडिसिया** नांवाची विधवा हिनें **इंग्लंडच्या** पूर्वेकडील भागांतील लोकांना चिथवून उठविलें; आणि त्याकाळीं तटबंदी नसून खुलें असलेलें **ब्रिटिशांचें लंडन** नांवाचें शहर **रोमनांनीं** जाळलें, आणि **रोमन** लोकांचा तुराडा होऊन

रोमन लोकांनीं ब्रिटन इ० स० ४३ त जिंकलें.

कराक्टेकस, इ० स० ५०.

बोआडिसिया, इ० स० ६१.

त्यांच्या अगदीं नाकीं नऊ आले, तेव्हांच त्यांची सरशी झाली. **बोआडिसिया** राणीनें शत्रूंच्या हातीं लागणें ही लाज टाळावी म्हणून विष खाऊन प्राण दिला असें म्हणतात.

रोमनांच्या अमलाचीं ३०० वर्षे.

त्यानंतर **रोमनांनीं ब्रिटनां**तील लोकांवर सुमारें तीनशें वर्षें- पर्यंत, ज्या धर्तीवर **हिंदुस्तानावर इंग्लिश** लोक हालीं राज्य करीत आहेत, त्याच धर्तीवर बहुतअंशीं राज्य केलें. त्यांनीं चांगले कायदे केले, आणि मजबूत रस्ते बांधले, ते अद्यापि आहेत. त्यांपैकीं एका रस्त्याला **वाट्लिंगस्ट्रीट** असें म्हणतात (नकाशा- नंबर २ पहा). तो **डोव्हर**पासून निघून **लंडन** शहरामधून जाऊन **चेस्टर**पर्यंत पोहोंचलेला आहे. **रोमनांनीं**, घरें, आणि भोंवतीं बागा असलेले असे वाडे, सार्वजनिक हमामखाने (म्हणजे नहाण घरें), आणि नाटकगृहें बांधलीं, आणि त्यांच्या अमलांत **यार्क, लिंकन,** व **चेस्टर** वगैरे, अनेक मोठीं मोठीं शहरें त्या देशाच्या वेगवेगळ्या भागांत वसून उदयास आलीं. **लाटिन** भाषेंत, छावणी अथवा तटबंदी ठिकाण ह्या अर्थी **कास्ट्रा** असा शब्द आहे, त्यापासून **कास्टर** अथवा **सेस्टर** हे अंत्यावयव अथवा प्रत्यय उत्पन्न झाले. **रोमन** लोकांच्या अमलांत वसलेल्या शहरांपैकीं, आज ह्या प्रत्ययांवरून पुष्कळांचा पत्ता लागतो. उदाहरणार्थ, **डान्कास्टर, लेस्टर (लाइसेस्टर), मानचेस्टर** वगैरे. **रोमनांनीं** जंगलें तोडून जमीन साफ केली, आणि धान्य पिकविण्याच्या उद्योगाला उत्तेजन दिलें. इतकें कीं, **ब्रिटनाला** 'उत्तरेकडील दास्तान (कोठार)' असें म्हणूं लागले. ह्याशिवाय, **रोमनांनीं** पुष्कळ नवीन फळांची लागवड **ब्रिटनांत** चालू केली, खाणी लागणारीं ठिकाणें शोधून काढून खाणी खणण्याचा उद्योग चालू

केला, आणि **ब्रिटनां**तील लोकांस सुधारलेल्या लोकांच्या रीतिभाती शिकविल्या. ह्या **रोमन** कारकीर्दीच्या काळांतच **ख्रिस्ती** धर्माचे मिशनरिझ (धर्म शिकविण्यासाठीं पाठविलेले पाद्री) **ब्रिटनां**त प्रथम आले, आणि **ब्रिटन्स** व तेथील **रोमन** लोक ह्या उभयतांनींही **ख्रिस्ती** धर्म स्वीकारला.

रोमन लोक इ० स० ४०१ त ब्रिटन सोडून देण्यास लागतात.

जरी **रोमन** लोकांनीं बांधलेले रस्ते, भोंवतीं बगीचे असलेल्या वाड्यांतील फरसबंद्या, आणि मोठ्या भिंती, ह्या अद्यापि आहेत, तरी **ब्रिटनां**तील लोकांवर त्यांनीं बसविलेली छाप टिकली नाहीं. निदानीं **ब्रिटन** देश हा, **रोम** एथील बादशाही राज्याचा केवळ एक जिंकलेला परगणा असा होऊन राहिला होता. तेथील लोक त्यांना जिंकणाऱ्या त्या **रोमन** लोकांच्या अमलाखालीं सुखानें राहत, त्यांनीं त्यांच्या रीतिभाती उचलल्या, त्यांची **लाटिन** भाषा ही शिष्टसंप्रदायाची भाषा अशा समजुतीनें ती ते बोलूं लागले, आणि शत्रूंपासून आपल्या बचावाचा सारा भरवसा ते त्या **रोमन** लोकांवर ठेवूं लागले. इतके ते परतंत्र झाले असतांही, त्यांच्या अंतःकरणांची सारी ओढ आपले मूळचे कानू व राजेरजवाडे ह्यांकडे असे. आणि इ० स० ४०१ त जेव्हां, स्वदेशीं शत्रूंनीं फार पीडा दिल्यामुळें **रोमनां**नीं **ब्रिटन**च्या दक्षिण भागांतील आपलें सैन्य हळू हळू माघारें नेलें, तेव्हां, जर त्यांच्या मदतीवांचून उत्तरेकडील शेजारी रानटी **केल्ट** लोक ह्यांपासून **ब्रिटनां**तील लोक आपला बचाव करण्यास समर्थ असते तर, **रोमन** लोक आपला देश सोडून जात आहेत हें पाहून त्यांला फार आनंदच वाटला असता.

पिक्ट आणि स्काट.

हे शेजारी म्हणून म्हटलेले 'पिक्ट ऊर्फ कालिडोनियन', आणि 'स्काट' नांवाचे लोक मूळारंभीं आयर्लंडांतून आले, आणि त्यांच्याच वरून पुढें स्काटलंडाला तें नांव पडलें. ते रानवट व शूर होते. रोमनांनीं देखील मजबूत बंदिस्त भिंती बांधून केवळ त्यांना आपल्या जिंकलेल्या मुलुखाच्या जेमतेम बाहेर ठेवलें होतें इतकेंच. ह्या भिंतींपैकीं अति विख्यात भित म्हटली म्हणजे हेड्रियन नांवाच्या बादशाहानें बांधविलेली जी ती होय. ती साल्वे-फर्थ नांवाच्या खाडीपासून टाइन नदीच्या मुखापर्यंत बांधलेली होती. तिचे कांहीं भाग अद्यापि आहेत. रोमन लोक ब्रिटनचा त्याग करून जातात तोंच, हे पिक्ट आणि स्काट लोक रोमनांनीं बांधलेल्या भिंती फोडून येऊन ब्रिटनाच्या दक्षिण भागांतल्या लोकांस उपद्रव देऊं लागले. तेव्हां आपला बचाव करणें त्या लोकांना फार कठीण पडलें. ह्याचें कारण, रोमन लोकांनीं ब्रिटिश शिपायांना नेहमीं परदेशीं असलेल्या रोमन फौजेंत नोकरी करण्यास पाठविण्याची वहिवाट ठेवलेली होती. ह्यास्तव, ब्रिटनांतील लोकांना आपल्या बचावासाठीं रोमन फौज मागविणें प्राप्त पडलें. ती फौज एकवेळ आली, आणि तिनें त्या पिक्टांना व स्काटांना हटवून माघारें पिटून लावलें.

रोमन लोक इ० स० ४१० त ब्रिटन सोडून जातात.

परंतु त्यापुढें इ० स० ४१० त तमाम रोमन लोक, ब्रिटनांतील लोकांना त्यांच्या दैवाच्या हवालीं करून, तो देश सोडून निघून गेले.

इंग्लंडच्या इतिहासाचा आरंभ जेथून होतो तेथवर वरील वृत्तानें मजल आणली; कारण नंतर, ब्रिटनांतील लोकांना आपल्या बचावाची निराशा होऊन, तींत, ते पिक्ट व स्काट, ह्यां-

हूनही विशेष भयंकर अशा कांहीं शत्रूंस, आपण येऊन आम्हांला साहाय्य करा म्हणून, त्यांनीं बोलावलें. ते शत्रु त्यांच्या देशाच्या किनाऱ्यांभोंवतीं घिरट्या घालीतच होते. हे जे शत्रु म्हटलेले, तेच **इंग्लिशांचे** पूर्वज असून, त्यांनींच, **इंग्लिश** म्हणून ज्या लोकवंशाला म्हणतात, त्याची स्थापना केली. आतां, ते कोठून व कसे **ब्रिटनांत** आले, हें शिकावयाचें आहे.

प्रकरण २.

इंग्लिश लोक कसे उद्भवले

रोमन लोक **ब्रिटन** सोडून गेले त्यापूर्वीं शंभरांहून ज्यास्ती वर्षेंपर्यंत, त्यांना चांच्यांकडून मनस्वी उपद्रव होत होता. हे चांचे, **एल्ब** नदीभोंवतालच्या देशांतून **जर्मन** समुद्रावरून सपाटतळांच्या मोठमोठ्या बोटींतून (नावांतून), येत असत. **गाल** देशाच्या उत्तरेकडील, आणि **ब्रिटनाच्या** आग्नेयीकडील, किनाऱ्यांवर झडपा घालून, हे लुटारू पुंड, हातीं लागेल त्या लुटीसह, पुरुष, बायका, व मुलें, त्यांस पळवून घेऊन जात. हे **साक्सन** चांचे इतके यमस्वरूप आणि क्रूर होते कीं, **ब्रिटनांत** त्यांचा रिघाव होऊं न देण्यासाठीं **रोमन** लोकांनीं **हंबर** नदीच्या मुखापासून अहदतहद **व्हेक्टिस** ऊर्फ **आइल ऑफ् वाइट**(वाइट नांवाचें बेट)पर्यंत सभोंवार मजबूत किल्ले बांधले, आणि **'कौंट ऑफ् धि साक्सन शोर'** (साक्सन किनाऱ्याचा कौंट) ह्या नांवाचा एक अधिकारी, मुख्यत्वेंकरून समुद्रकांठाच्या बचावाच्या कामावर देखरेख ठेवण्याकरितां, नेमला.

साक्सन चांचे ४ थें शतक.

ट्युटनांचें मूळ.

हे स्वाऱ्या करणारे **ट्युटॉनिक** वंशांतले होते; आणि जरी **केल्ट्स,** व ते, पूर्वदिशेकडील देशांत असतां मूळचे एकाच वंशांत उत्पन्न झालेले होते, तरी कालगतीनें **केल्टां**पासून ते अगदींच भिन्न प्रकारचे बनलेले होते. ह्या **ट्युटनां**चें नांव ज्या काळीं पहिल्यानें इतिहासांत ऐकूं येतें, त्या काळीं, जसे **केल्ट** अनेक प्राग्युगांत हळू हळू सर्व **यूरोप**भर पसरलेले होते, तसेच तेही सर्व **यूरोप**भर पसरलेले होते; आणि जसें **केल्टां**नीं पूर्वी एका प्राचीन लोकवंशाला पिटून लावलें होतें, तसेंच आतां, ह्या **ट्युटनां**नींही **जर्मनी** देशाच्या मैदानांतून, **रोमन** लोक अटक करीत तेथवर, दक्षिणेकडे **केल्टां**ना पिटून लावलें. नंतर ते **ट्युटन,** उत्तरेकडे **वीसर** व **एल्ब** ह्या दोहों नद्यांच्या मधल्या मुलखांत, आणि तेथून पुढें वरती **जट्लंड, स्वीडन,** आणि **नार्वे,** ह्या देशांत शिरले. एथें त्यांच्या एका अंगास **बाल्टिक** समुद्र, व दुसऱ्या अंगास **नार्थ सी** (उत्तर समुद्र) असल्यामुळें, ते स्वभावतः मोठे धाडस समुद्रावर–भटकणारे झाले. पुढें, **जट्लंड** आणि **जर्मनी** ह्या देशांच्या किनाऱ्यांपासून निघून, दरएक बोटींत हांकण्याला निदान पन्नास तरी वल्हीं असत अशा आपल्या सपाटतळांच्या बोटींतून येऊन, **गाल** देशाचे सुंदर किनारे, आणि त्याच तोडीचे **ब्रिटन**चे सुपीक कांठ, ते नासधूस करून वैराण करून सोडीत.

ब्रिटनांत **रोमन** लोक होते तोंवर, त्या बेटांत त्यांचा पायशिरकाव होण्याचा बिलकूल लाग नव्हता. आणि **रोमन** लोकांचें लष्कर **ब्रिटन** सोडून गेल्यावर देखील, तेथील लोकांनीं सुमारें चाळीस वर्षेंपर्यंत त्यांचा आंत रिघाव होऊं दिला नाहीं. शेवटीं, खुशकीनें **पिक्ट** व **स्काट** लोकांच्या, आणि समुद्रावरून ह्या

नकाशा नं १


इंग्लिशांचीं राज्यें
इ.स. ६०० च्या सुमारास असलेलीं
मैलांचें स्केल
० २० ४० ६० ८०
ज्यूट्स
आन्गल्स
साक्सन्स
ब्रिटन्स
पिक्ट्स
स्कॉट्स
इओना
निडिस्फार्न
बाम्बरो
जार्रो
व्हिटबी
गॉडमांडिंगहाम
म्व्हानिया
उत्तर आगल्स
नार्थ फोक
पूर्व आंगिल्स
साउथ फोक
लंडन
सेलसी
वाइटबेट
एक्झीटर
पश्चिम वेल्स
डाइफेड
ग्रीनिच व्या प. ०

साक्सन चांच्यांच्या, हल्ल्यांनीं जर्जर होऊन, **ब्रिटनां**तील लोकांनीं, एका शत्रूला अनुकूल करून घेऊन त्याकडून दुसऱ्या शत्रूचें पारिपत्य करवावें असा निश्चय केला. ह्या निश्चयास अनुसरून **ब्रिटिशांच्या व्हार्टिजर्न** नांवाच्या एका राजानें, इ० स० ४४९ त, **जट्लंडां**तून त्या चांच्यांचे **हेन्गेस्ट** आणि **हार्सा** ह्या नांवांचे दोघे सरदार ह्यांस, **केंट** प्रांताच्या उत्तरेस **थानेट** नांवाच्या बेटांत तुम्हीं येऊन वसाहत करून रहावें, आणि **पिक्टां**शीं आमच्या चाललेल्या लढाया तुम्हीं लढाव्या, अशा करारानें बोलावणें केलें असें सांगतात. तें बोलावणें स्वीकारून **जूट** लोकांनीं कराराप्रमाणें काम केलें. परंतु, **पिक्टां**ना जिंकतांच त्या **जूटां**नीं खुद्द **ब्रिटन्स** लोकांवरच शस्त्र धरलें. तेव्हां जी पहिली लढाई झाली तींत, **हार्सा** हा ठार मारला गेला; परंतु, **हेन्गेस्टा**नें पुढाईत होऊन त्या **जूटां**ना पुढें चालविलें, आणि तीस वर्षेंपर्यंत युद्ध चालून, त्याचा पुत्र **एरिक** ह्यानें **पूर्वकेंट** व **पश्चिमकेंट** (नकाशा नंबर १ पहा) हीं दोन लहान राज्यें स्थापिलीं. त्या राज्यांची राजधानी किंवा मुख्य शहर **कान्ट-वारा-बाइरिग** ऊर्फ **केन्टमेन्स्बरो** हें होतें. तेंच हालींचें आमचें **कांटर्बेरी** शहर होय. ह्यावरून **जूट** हे **इंग्लिशां**च्या पूर्वजांपैकीं **ब्रिटनां**त पहिले वसाहत करणारे होत.

जूट लोक येऊन इ० स० ४४९ त ब्रिटनांत जमिनीवर उतरले.

परंतु **ब्रिटनां**त हा प्रकार चालला असतां, दरम्यानच्या काळांत दुसऱ्या चांच्यांच्या बोटी **ब्रिटिश चानल**मध्यें घिरट्या घालीतच असत. त्यांनीं, जिंकतां येण्याजोगा असा एक नवीन मुलूख आहे, ही बातमी वर्षानुवर्ष स्वदेशीं माघारी न्यावी. असा क्रम

साक्सन लोक इ० स० ४७७ त आले.

कित्येक वर्षें चालून, शेवटीं इ० स० ४७७ त **ब्रिटना**च्या समोरील **एल्ब** व **वीसर** ह्या दोहों नद्यांमधील देशाच्या किनाऱ्यांवरच राहणारे **साक्सन** लोक, आपले सरदार **एल्ले** आणि **सिस्सा** ह्यांसहवर्तमान समुद्रांतून येऊन, **ब्रिटन**च्या दक्षिण किनाऱ्यावर **रेग्नम** नांवाच्या **रोमन** शहरानजीक उतरले. त्या **रेग्नम** शहराला **सिस्सा** सरदाराच्या नांवावरून **सिस्सान्सीस्टर** हें नांव पडलें. तेंच पुढें **चिचेस्टर** नांवाचें शहर झालें. ह्या **साक्सनां**च्या येण्यापूर्वीच फार दिवसांपासून **ब्रिटनां**तील लोकांस, परदेशीय दोस्त लोकांना आपण मदतीकरितां आणविलें ही मोठी चूक झाली, असा अत्यंत खेदकारक पस्तावा होत होता. कारण ह्या नवीन स्वाऱ्या करणारांनी त्यांच्या देशांत येऊन, तेथील सर्वांना ठार मारलें, किंवा पिटून लावलें; आणि जेव्हां **सिस्सा** ह्यानें, जेथें हालींचें **पेव्हन्सि** नांवाचें गांव आहे त्याच्या नजीकच त्या कालीं **आंडेरिडा** नांवाचें शहर होतें तें घेतलें, तेव्हां तर त्यानें एकही **ब्रिटन** जिता सोडला नाहीं. **साक्सनां**ची पुढें चाल फारच मंदाईनें झाली, कारण तो देश निबिड अरण्यें, दलदली, आणि पाणथळी, ह्यांनीं व्याप्त होता, आणि तशांत, **ब्रिटन्स** लोक जिवावर उदार होऊन लढत होते. त्या काळांत लढाया म्हटल्या म्हणजे अंगाशीं अंग भिडवून हातझोंब्या असत, आणि आदल्या दिवशीं सरशी होऊन जिंकलेलें ठिकाण वारंवार पुढल्या दिवशीं गमावत असे. इ० स० ५२० त, **ब्रिटिशां**चा राजा **आर्थर** (ह्याच्या संबंधानें **नाइट्स ऑफ् धि राउन्ड टेबल** म्हणजे वाटोळ्या मेजाचे सरदार बहादर ह्यांसंबंधी आख्यायिका सांगत असतात) ह्यानें पश्चिमेकडील **साक्सनां**चा इतका पुरा पराजय केला, कीं, अनेक वर्षेंपर्यंत त्यांना पुढें पाऊल टाकूं दिलें नाहीं.

ब्रिटनांशीं झगडे.

त्यांचें पाऊल पुढें पडावयाला केवळ काळ लागणार होता इतकेंच. **ब्रिटन** लोकांत एक जूट नसून फळ्या होत्या, आणि त्यांवर स्वारी करण्यास आलेल्या लोकांना मिळून त्यांचें बळ वाढविण्याकरितां म्हणून प्रतिवर्षी समुद्रावरून ज्या **साक्सनांच्या** नव्या नव्या झुंडीच्याझुंडी येत, त्यांच्यापुढें **ब्रिटनांचा** कांहीं इलाज चालेना. ते नवीन येणारे लोक आपल्या बायका, पोरें, व गुरेंढोरें, संगतीं घेऊन येत, आणि नवीन जमिनीचा तुकडा हातीं लागतांच, त्यावर नवीं घरेंदारें बांधण्यासाठीं अडेलपणानें स्थायिक होऊन राहत.

साक्सनांच्या वसाहती.

ही गोष्ट खरी कीं, त्या **साक्सनांना ब्रिटनचा** दक्षिण भाग काबीज करण्याला साठ वर्षे लागलीं. परंतु त्या तितक्या काळाच्या अखेरीस, **सौथ** (दक्षिण) **साक्सन्स** अथवा **ससेक्स**, **वेस्ट** (पश्चिम) **साक्सन्स** अथवा **वेसेक्स**, **ईस्ट** (पूर्व) **साक्सन्स** अथवा **एसेक्स**, आणि **मिडल** (मध्य) **साक्सन्स** अथवा **मिडलसेक्स**, हीं चार राज्यें त्यांनीं स्थापिलेलीं होतीं, आणि **ब्रिटनांना**, ज्या पश्चिमेकडील भागांत आतां **समर्सेट**, **डेव्हन**, आणि **कार्नवाल**, हे कौंटि आहेत, त्या भागांत त्यांनीं पिटून लावलें.

आन्गल्स नांवाच्या लोकांच्या वसाहती.

इतकें वृत्त होत आहे तों मधल्या काळांत, **ब्रिटनच्या ईशान्येकडील** भागांत '**आन्गल्स**' नांवाचे दुसऱ्या एका जातीचे हजारों परदेशीय लोक येऊन वसाहती करीत होते. हे **आन्गल्स** लोक, **आइडर** नदीच्या उत्तरेस जो **स्लेस्वुइग** नांवाचा देश आहे, त्यांतील **आन्गेल्न** नांवाच्या एका लहानशा प्रांतांतून आले. इतर जातींहून ह्या **आन्गल** नांवाच्या जातीकडे अधिकें लक्ष वि-

शेष ओढतें. ह्याचीं कारणें दोन आहेत. (१) त्या जातींतील बहुशः सारे लोक आपलें सर्वस्व घेऊन येऊन **ब्रिटन** देशाला स्वदेश मानून त्यांत चिरस्थायी होऊन राहिले. (२) त्यांनीं आपलें **आन्गल्स** अथवा **एन्गल्स** हें नांव आमच्या राष्ट्राला दिलें.

ते **आन्गल्स ब्रिटना**च्या किनाऱ्यावर केव्हां प्रथम येऊन उतरले, तो काळ बरोबर माहीत नाहीं. परंतु इतकी माहिती लागते कीं, त्यांच्यापैकीं कांहीं लोकांनीं **हंबर** नदीच्या मुखावाटे त्या नदींतून वर बोटी हकारून येऊन, **डाइरा** नांवाचें राज्य स्थापिलें. पुढें इ० स० ५४७ त त्या जातीपैकीं दुसरी एक टोळी **आइडा धि फ्लेम–बेरर** (ज्वालावाहक) नांवाच्या सरदाराच्या हुकमतीखालीं, **आन्गेल्न** एथून ५० बोटीतून येऊन, **डाइरा**हूनही उत्तरेकडे वर जाऊन, तिनें **बर्निशिया** नांवाचें राज्य स्थापिलें; आणि ५० वर्षें पर्यंत किंवा त्यांहूनही ज्यास्ती वर्षेंपर्यंत झगडा चालून, **बर्निशिया** आणि **डाइरा** हीं दोन्ही राज्यें इ० स० ६३०त संयुक्त होऊन **नार्थ-हंबर–लंड** ह्या नांवाचें नवीन राज्य स्थापित झालें.

नार्थंब्रिया नांवाच्या राज्याची स्थापना इ० स० ६०३.

त्याचा विस्तार **हंबर** नदीपासून थेट **फर्थ ऑफ् फोर्थ** नांवाच्या खाडीपर्यंत होता. ह्या हकीकतीवरून, **हाइलंडर्स** हे **केल्ट** असून, **लोलंड स्काच** हे **ट्युटन** कां असावेत, ह्या गोष्टीची उपपत्ति बसते. **आन्गल्सांनीं केल्टांना**, **हाइलंड्स** नांवाचा जो उंच डोंगराळ प्रदेश आहे त्यांत, पिटून लावलें, आणि **लोलंड्स** नांवाचा जो सखल सपाट प्रदेश आहे तो त्यांनीं आपल्या हातीं ठेविला. **एडिंबरो** शहराचें मूळचें नांव **ईड्वाइन्सबर्ह** हें असून, तें, **आंग्लियन** वंशांतील पुढील राजे झाले, त्यांपैकीं **ईड्वाइन** अथवा **एड्वुइन** नांवाचा एक

राजा होता त्याच्या नांवावरून पडलें. उत्तरेकडे हा प्रकार चालला असतां, मधल्याकाळांत **हंबर** नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशांत दुसरे **आंगल्स** लोक येऊन वसाहती करीत होते. **नार्थ–फोक** (उत्तरेकडील लोक) आणि **सौथ–फोक** (दक्षिणेकडील लोक) ह्या नांवांचे लोक, **नार्फक** आणि **सफक** हे जे दोन कौंटी अद्यापि त्यांच्याच नांवांनीं मोडतात, त्यांत वस्ती करून राहिले; आणि त्यांनीं **ईस्ट** (पूर्व) **आंग्लिया** (नकाशा नंबर १ पहा) नांवाचें राज्य स्थापिलें. दुसरे कांहीं **आंगल्स** लोक **इंग्लंडच्या** मध्यप्रदेशांत, म्हणजे ज्या भागाला हालीं **मिड्लंड कौंटीझ** असें म्हणतात त्या भागांत घुसले. ह्या मध्यस्थित **आंगल्सांना मार्चमेन** किंवा **बार्डरमेन** (सरहद्दीवर राहणारे लोक) असें म्हणत, कारण अजून **ब्रिटनांच्या** ताब्यांत कांहीं मुलूख होता, त्याच्या सरहद्दीवर ते राहत. **मार्चमेन** ह्यांची जी भूमि तिला **मार्च–ल्यांड** अथवा **मर्शिया** असें म्हणत.

ईस्ट आंग्लिया आणि मर्शिया.

आणि अशी गोष्ट घडून आली कीं, सुमारें सहाव्या शतकाच्या अखेरीस, म्हणजे **रोमन** लोक **ब्रिटन** सोडून गेल्यानंतर २०० वर्षांनीं, **ब्रिटनांना इंग्लंडच्या** पश्चिमेकडील प्रदेशांत, पिटून लावलेलें होतें. म्हणजे दक्षिणेकडे **डेव्हन-शायर** आणि **कार्नवाल** ह्या कौंटींत (किंवा पश्चिम **वेल्सांत**), पश्चिमेकडे **उत्तर वेल्सच्या** पहाडांत, आणि उत्तरेकडे दूर **कंबर्लंड, वेस्टमर्लंड**, आणि **लांकाशायर** (त्या काळीं ह्या तीनही कौंटींना मिळून '**स्ट्राथक्लाइड**' असें नांव होतें) ह्या कौंटींत. त्या **ब्रिटनांना** ह्या काळाच्या सुमारास **वेल्श** असें म्हणूं लागले होते. तें नांव, **आंगल्स** लोक, त्यांच्याहून जे परकी, किंवा त्यांनी भाषा

त्यांना कळत नसे, त्या लोकांना वापरीत असत. **ब्रिटनचा** बाकीचा भाग **जूट्स, आंगल्स,** आणि **साक्सन्स,** ह्या लोकांच्या हातीं होता. ह्या सर्वांना **वेल्श** लोक **साक्सन्स** असें म्हणत. परंतु कालांतरानें त्या तिघांची मिळून एक शाई किंवा रयासत झाली तेव्हां, त्यांना कधीं कधीं **आंग्लो-साक्सन्स** असें म्हणत. आपआपसांत ते आपणांला सामान्यतः **इंग्लिश** असें म्हणत.

वेल्श आणि इंग्लिश.

इंग्लिश चानलपासून **फर्थ ऑफ् फोर्थ**पर्यंत त्या बेटाचा पूर्वेकडील सर्व भाग त्या लोकांच्या सत्तेखालीं होता, आणि त्या भागाचीं सरासरी अजमासानें विभागून सात मुख्य राज्यें किंवा संस्थानें केलेलीं होतीं, तीं हीं. **१ केंट** हें **जूटांचें. २ ससेक्स, ३ वेसेक्स,** आणि **४ एसेक्स,** हीं तिन्ही साक्सनांचीं. **५ नार्थंब्रिया, ६ आंग्लिया,** आणि **७ मर्शिया,** हीं तिन्हीं आग्लांचीं. ह्या सात संस्थानांना मिळून **हेप्टार्की** म्हणजे सप्तराज्य किंवा राज्यसप्तक असें म्हणत आले आहेत. हालींच्या काळांतील राज्यें जशीं आपण समजूं, तसले हे निश्चित ठरलेले काईम विभाग होते असें मात्र समजूं नये. **आंग्लोसाक्सन** लोक स्वतंत्र असून, ते, वेगवेगळ्या टोळ्यांनीं, आपआपल्या आवडत्या सरदारांच्या हातांखालीं, मिळेल तें ज्यांचें त्यांनीं घ्यावें ह्या हेतूनें, आपआपला देश सोडून **ब्रिटनांत** आले. **ब्रिटनांशीं** त्यांचें युद्ध जुंपलेलें नसे तेव्हां, जे ते आपली मात्रा वर व्हावी ह्या प्रयत्नांत असून, एकमेकांशीं झगडत असत. ह्यामुळें, तीं वेगळालीं सात राज्यें एकत्र मिळून **इंग्लिश** लोकांची एक शाई किंवा रयासत होण्यापूर्वीं, अनेक वेळां मोडमोडून फिरफिरून सांधलीं जावीं असा प्रकार चालू होता.

सप्तराज्य हा शब्द भ्रम उत्पन्न करणारा आहे.

ह्या काळचा इतिहास बरोबर समजण्याला, निबिड अरण्यें, विस्तृत पाणथळी, आणि दलदली, ह्यांनीं व्याप्त असून मध्येंमध्यें मैदानांतून मात्र ज्यांत ओस पडिक जमिनी आहेत, अशा एका जंगली देशाचें चित्र मनापुढें आणलें पाहिजे. **रोमन** लोकांनीं बांधलेले रस्ते त्या देशाच्या विशेष सुधारलेल्या भागांत अद्यापि काईम होते. परंतु पश्चिमेकडल्या भागांतील पहाडांचा **ब्रिटन** लोक आसा करून राहिलेले होते त्या भागांत, रस्ते म्हटले म्हणजे फक्त त्या पहाडांतून अरुंद, चेचड किंवा उंचसखल पायवाटा होत्या तेवढेच होते. त्या देशाच्या पूर्वेकडील मैदानांत, आणि उतार चढाच्या प्रदेशांत, **इंग्लिशांच्या** कोणत्या तरी एका जातीचीं खेडीं, ठायीं ठायीं जमावानें वसलेलीं असावींत; आणि त्यांच्या भोंवतीं कांहीं लागवडीस आणलेली जमीन असावी. **रोमन** लोकांनीं जीं शहरें बांधलेलीं होती त्यांतून थोड्या लोकांची वस्ती राहिलेली असावी, आणि तीं शहरें नष्ट होत जात असावींत.

इंग्लिश लोकांचीं मूळचीं खेडीं.

खेड्यांतील लोक, नुकतेच दर्यावर्दीपणाचा धंदा सोडून घरंदारें करून राहून थिरावत चाललेले, अडदांड, रांकट, आणि स्वतंत्र होते. गांवांत अतिमोठें घर म्हटलें म्हणजे **एथेलिंग** किंवा **इओरल** म्हणजे खानदानीचा, व इतरांहून श्रीमंत असा जो कोणी असेल त्याचें असलें पाहिजे. परंतु **सिओरल्स** अथवा **चर्लस** (म्हणजे शेतखप्ये) हे लोक स्वतंत्रच होते पण कमी दरजाचे. त्या प्रत्येकाचें देखील, त्याला शेतकीकरितां वांटून दिलेल्या स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर बांधलेलें जातीचें

इओरल्स आणि सिओरल्स.

घर असे. कांहीं उशिरां येणाऱ्या लोकांना स्वतःच्या मालकीची जमीन नसल्यामुळें, ते सिओरल्स लोकांचें काम करीत. त्यांना लेएट्स असें म्हणत. शिवाय गुलाम म्हणून बरे पुष्कळ असत. ते, पराजित ब्रिटन लोक, किंवा ज्यांनीं आपलें स्वातंत्र्य गमावलेलें किंवा विकलेलें असेल असे लोक असत. ह्या गुलामांना त्याच देशांत किंवा परदेशांत त्यांचे धनी विकीत. एकंदरीनें पाहतां स्वतंत्र लोकांची संख्या ज्यास्त होती. त्यांचीं स्वतःच्या मालकीचीं घरें व जमिनी असत, आणि त्यांना गांवची मूट किंवा मीटिंग (म्हणजे मेळा, मंडळी) हींत मत देण्याचा अधिकार असे.

लेएट्स आणि गुलाम.

खेड्यांतील मूट (मेळा किंवा मंडळी.)

ही मूट, गांवांतील पवित्र मानलेल्या वृक्षाभोंवतीं, ज्यांविषयीं वाद पडलेला असेल अशा गोष्टी, व जमिनीच्या वांटण्या, ह्यांविषयीं ठराव करण्यासाठीं जमे. कोणी माणसानें गुन्हा केलेला असला तर, त्याचा न्याय निवाडा त्याचेच जातभाई करीत, आणि तो निरपराध आहे अशी शपथ वाहण्याला जर त्याला दहा पांच प्रामाणिक मनुष्य मिळाले तर तो गुन्ह्यांतून मुक्त होई. ह्या दोषमुक्ततेच्या प्रकाराला 'काम्पर्गेशन' (पडसाक्षीनें दोषमुक्त करणें) असें म्हणत. ह्या प्रकारानें तो अपराधी आपल्यावरील गुन्हा नासाबीत करण्याला समर्थ नसला तर, त्याला 'आर्डील' (दिव्य), किंवा 'जजमेंट ऑफ् गॉड' (देवाचा न्याय) ग्रहण करण्याला परवानगी देत. ह्या दिव्याचे दोन प्रकार होते. (१) डोळे बांधून येऊन नांगरांच्या तापून, लाल झालेल्या फाळींवरून अणवाणी चालणें, किंवा (२) क-

काम्पर्गेशन (पडसाक्षीनें दोषमुक्त करणें), आणि आर्डील (दिव्य).

ढत्या उकळी फुटलेल्या पाण्यांत हात बुडविणें. ह्या दिव्यानें अपराध्याला इजा किंवा दुखापत झाली नाहीं, तर तो निरपराध ठरे.

प्रत्येक खेडें किंवा शहर ह्याच्या सीमांभोंवतीं ओबड धोबड कुंपण असे त्याला **'टुन'** असें म्हणत. त्या खेड्याच्या किंवा शहराच्या, आणि शेजारच्या खेड्याच्या किंवा शहराच्या, दरम्यान ओसाड जमीन सोडलेली असे; तिला **'मार्क'** (खूण) अथवा **मार्च** (शींव) असें म्हणत. त्या जमिनीवर कोणालाही दावा करितां येत नसे. कोणी परकी माणूस ती **मार्क** (खूण) ओलांडून आंत आला, म्हणजे तो शिंग फुंकी, नाही तर कोणालाही त्याला ठार मारण्याचा हक्क होता.

हन्ड्रेड्झ (शतकुटुंब-समुदाय).

शहर गांवें एकत्र करून त्यांचे **हन्ड्रेड्झ** म्हणजे शतकुटुंबसमुदाय नांवाचे प्रांतविभाग केलेले होते, आणि युद्धाकरितां, अथवा एकाद्या मोठ्या वादाचा निकाल करण्याकरितां, लोकांना एकत्र जमावयाचें असे तेव्हां, प्रत्येक खेड्यांतील कांहीं **फ्रीमेन** (स्वतंत्र गृहस्थ) मोठी **'फोकमूट'** अथवा सर्व जातीची जमात (सभा), हीत एकत्र जमत; आणि ते **फ्रीमेन, इओरल्स** (खानदानीचे लोकां)पैकीं लढाईत नायकी किंवा सरदारी करण्यासाठीं, किंवा **'वुइटान्जिमोट'**(बुधजनमंडल)मध्यें आपल्यावतीं बोलण्यासाठी, **ईल्डॉर्मेन** किंवा **आल्डर्मेन** (गांवचे सनदी अधिकारी) म्हणून निवडून नेमीत.

फोकमूट आणि वुइटान.

त्या **वुइटान्जिमोट**मध्यें कायदे कानू करीत, आणि सल्ला किंवा लढाई करावयाची, ह्याविषयीं पडलेल्या वादांचा निकाल करीत. **ईंग्लिश** लोक **ब्रिटनांत** आले त्यापूर्वी, त्यांच्या प्रत्येक टोळीवर तिचा एक एक **आल्डर्मेन**

(सनदी अधिकारी) अंमल करणारा असे. परंतु **ब्रिटनांत** आल्यावर परराष्ट्रीय लोकांविरुद्ध त्या टोळ्यांना एक होणें प्राप्त पडलें तेव्हां, इतर सर्व **आल्डर्मेनांहून** श्रेष्ठ असा एक **आल्डर्मेन**, अनेक टोळ्यांवर मिळून, राजा म्हणून ते निवडून नेमीत. ह्या राजाच्या पदरीं त्याचे खुद्द निसबतीचे **थेन्स** अथवा निवडक लढवय्ये लोक, ह्यांची टोळी असे, तथापि त्याला **वुइटान** (बुधजनमंडल), व सर्व लोक, ह्यांच्या अनुमतावांचून कांहीं करतां येत नव्हतें. फार काय, परंतु आपल्या मागून कोणीं राज्य करावें, ह्या गोष्टीविषयीं देखील त्याला ब्र काढतां येत नव्हता. प्रत्येक राजाची निवडणूक होऊन नेमणूक व्हावी लागे. ही राजांची निवडणूक एकाच घराण्यांतून होत असे, कारण त्यांचा **वोडेन** नांवाचा जो युद्धाचा मोठा देव होता, त्यापासून कितीएक घराणीं उत्पन्न झालेलीं होतीं, असा त्या लोकांचा ग्रह होता.

निवडलेले राजे.

कारण ते **आंगल्स** लोक अद्यापि मूर्तिपूजक होते, आणि ज्या **ब्रिटनांना** त्यांनीं जिंकिलें, ते जरी **ख्रिस्ती** होते, तरी त्यांपासून ते तो धर्म शिकले नाहींत. आम्हांमध्यें जीं आठवड्यांतील वारांचीं नांवें आहेत तीं, आमच्या पूर्वजांच्या देवांचीं स्मारक आहेत. **वेन्झडे** (बुधवार) हा **वोडेन** देवाचा दिवस. **थर्सडे** (बृहस्पतिवार) हा, **थॉर** नांवाचा जो मेघगर्जनेचा देव होता, त्याचा दिवस. **फ्राइडे** (शुक्रवार) हा, शांति आणि बहुफलता ह्यांची जी **फ्रेया** नांवाची देवता होती, तिचा दिवस. **इऑस्ट्रे** नांवाची जी वसंतऋतूची देवता, होती तिच्या नांवा-

त्या मूर्तिपूजकांचे देव.

वरून **ईस्टर**[1] हें नांव उत्पन्न झालेलें आहे. वर सांगितलेल्या मुख्य देवांखेरीज, जलदेवता, अरण्यपिशाचें, पृथ्वी आणि वायु ह्यांतील पिशाचें, देवत्वाप्रत पावलेले वीर पुरुष, आणि चेटक्या बायका, इतक्या गोष्टी ते **आंगल्स** श्रद्धापूर्वक मानीत. असें असतांही, ह्या प्राचीन **इंग्लिशांचा** खरा धर्म म्हटला म्हणजे, ज्या ह्या देवभोळेपणाच्या गोष्टी ते श्रद्धापूर्वक मानीत, त्यांत नव्हता; तर तो, सत्कर्म, न्याय, स्वातंत्र्य, आणि जीवदशा आणि मृत्यु ह्यांविषयीं जें गूढ आहे तें, इतक्या गोष्टींविषयीं त्यांना जें पराकाष्ठेचें ज्ञान होतें, त्यांत होता. आणखी ते लोक फार भाविक किंवा कळकळीचे होते म्हणूनच, जेव्हां **ख्रिस्ती** धर्म **इंग्लंडांत** आला, तेव्हां त्यांवर त्यानें इतका बळकट धर धारिला.

क्रिस्चियानिटि (ख्रिस्ती धर्म).

इंग्लंडांत त्या धर्माचा प्रवेश फार हळूहळू झाला, आणि त्याच्या संबंधानें अनेक झटापटी झाल्या. **ग्रेगरी धि ग्रेट** ह्या नांवाचा जो **पोप** (रोमन क्याथोलिक धर्माचा सर्वश्रेष्ठ गुरु) होऊन गेला, तो वयानें अगदीं तरुण असतां, त्यानें एका वेळीं **रोम** शहरांतील बाजारच्या जाग्यांत कांहीं तरण्या सुंदर केशांच्या मुलग्यांना गुलाम म्हणून विकतांना पाहिलें. तेव्हां त्यांचें सौंदर्य पाहून, त्याचें अंतःकरण सद्गदित होऊन, त्यानें ते मुलगे मूळचे कोणत्या देशचे म्हणून पुसलें; आणि ते **आंगल्स** आहेत असें

---

१ **ईस्टर** हा मूळचा आंग्लोसाक्सन शब्द असून, त्याचा अर्थ, **ईआस्ट्रे** नांवाची जी वसंतऋतु व प्रकाश ह्यांची देवता होती, तिचा एप्रिल महिन्यांत उत्सव होत असे तो उत्सवाचा काळ असा होता. ख्रिस्ती लोकांत ख्रिस्ताचें शवगर्तेपासून पुनः जीवंत होऊन उठणें, एतन्निमित्त जो उत्सवाचा काळ बहुशः एप्रिल महिन्यांत येतो त्याला ईस्टर असें म्हणतात. भा. क.

जेव्हां त्यानें ऐकलें तेव्हां, तो म्हणाला "ज्यापक्षीं त्यांचे चेहरे इतके एन्जल-लाइक (देवदूतांसारखे) आहेत, त्यापक्षीं ते **आंगल्स** नाहींत, एन्जल्स (देवदूत) आहेत." पुढें तो **पोप** झाला तेव्हां, पूर्वी पाहिलेल्या त्या मूर्तिपूजकांच्या सुंदर मुलग्यांचें त्याला स्मरण झालें, आणि इ० स० ५९६ त **आगस्टाइन** नांवाचा एक **रोमन आबट** (रोमन क्याथोलिक धर्मांतील महंत) ह्याला, बरोबर चाळीस **मंक** (रोमन क्याथोलिक धर्मांतील जोगी) देऊन, **इंग्लिश** लोकांना **ख्रिस्ती** धर्माचें **गास्पेल** (शुभवर्तमान, ख्रिस्ताचें चरित आणि मोक्षदान ह्याविषयीं सुवार्ता, किंवा ख्रिस्ती धर्मांतील मुख्य मतांचा सारांश) शिकविण्यासाठीं त्यानें पाठविलें. **आगस्टाइन** हा येऊन **केंट** नांवाच्या कौंटीच्या किनाऱ्यावर उतरला. तेथें त्या काळीं **एथेल्बर्ट** नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यानें एका **ख्रिस्तीधर्मी बर्था** नांवाच्या स्त्रीशीं विवाह केलेला होता. ती एका **फ्रांकिश** (फ्रांक लोकांच्या) राजाची कन्या होती. **एथेल्बर्ट** राजानें, **थानेट** नांवाच्या बेटावर, आपणावर तो कांहीं एखादा मंत्र फेकील ह्या भीतीनें, उघड्या हवेंत **आगस्टाइनाची** भेट घेतली, आणि उतावीळपणा न करितां त्याचें भाषण त्यानें कान देऊन ऐकून घेतलें. शेवटीं इ० स० ५९७ च्या जून महिन्याच्या २ ऱ्या तारखेस त्या राजाला त्याच्या पदरच्या अनेक लोकांसह बाप्तिस्मा (धर्मनिवेशार्थकजलसंस्कार) दिला.

सारा केंट प्रांत ख्रिस्तीधर्म स्वीकारतो, इ० स० ५९७.

हा विधि **कांटर्बरी** नांवाच्या शहराच्या मुख्य वेशीबाहेर जेथें **सेंट मार्टिन** नांवाचें लहान चर्च (भजनमंदिर) हालीं आहे त्या जागीं झाला. त्या दिवसापासून **केंट** नांवाचें सारें राज्य, ख्रि-

ख्रिस्तीधर्मी झालें, आणि **आगस्टाइन** हा **कांटर्बेरी**चा पहिला **आर्चबिशप** (बिशपांच्या वरील धर्माध्यक्ष) झाला.

नार्थंब्रिया नांवाच्या राज्यांतील लोक ख्रिस्ती-धर्म स्वीकारतात.

केंट नांवाच्या राज्यापासून तो नवीन धर्म **नार्थंब्रिया** नांवाचें राज्य होतें त्यांत पसरला. त्या देशचा राजा **एड्वुइन** ह्यानें **एथेल्बर्ट** राजाच्या कन्येशीं विवाह केला. तिनें नवऱ्याच्या देशीं जातांना **पालिनुस** नांवाच्या एका **मंकाला** (जोग्याला) आपल्याबरोबर नेलें. तेव्हां **एड्वुइनानें** आपलें **वुइटान** (बुधजनमंडल) भरविलें. त्या मंडलांतील सभासदांनीं, मृत्यूनंतर मनुष्यप्राण्याला एक जीवदशा आहे असें प्रतिपादन करणारा तो नवीन धर्म, त्या **पालिनुसा**च्या मुखानें फार लक्ष्यपूर्वक ऐकला; आणि त्या राजानें व त्या सभासदांनीं तो **ख्रिस्ती**धर्म स्वीकारला. **एड्वुइन** हा फार बलाढ्य राजा होता, कारण, **केंट**च्या राजाखेरीज इतर सर्व राजे, त्याला आपला **'ब्रेट्-वाल्डा'** म्हणजे अधिराज मानीत असत. तो **एड्वुइन** आपला राज्यकारभार इतका चांगला करी कीं, त्याच्या कारकीर्दीत "कोणाही बायकोनें आपलें तान्हें मूल वेंगेवर घेऊन खुशाल निर्भय ह्या समुद्रापासून तों त्या समुद्रापर्यंत चाललें जावें" अशी म्हण पडलेली होती. इतका बंदोबस्त त्या पुंडाईच्या मुलुखांत असणें, ही मोठीच गोष्ट म्हणावयाची.

प्राचीन इंग्लिश लोकांचे मुख्य राजे.

इ. स. ४४९
जूट लोक येऊन केंट प्रांतांत जमिनीवर उतरतात.

इ. स. ४७७
मिस्सा नांवाच्या सरदाराच्या हाताखालीं साक्सन लोक येऊन जमिनीवर उतरतात.

इ. स. ५४७
आन्गल्स लोक येऊन ब्रिटनांत वसाहती करून राहतात.

पुढें अनेक एकामागून एक छोटेखानी राजे झाले, त्यांपैकीं लक्ष्यांत ठेवण्यास अतियोग्य जे होते ते येणेंप्रमाणें.

केंट.
इ. स. ५९७
एथेल्बर्ट
हा पहिला ख्रिस्ती राजा.

ससेक्स—वेसेक्स—एसेक्स
|
सर्डिकाचा वंश
वेस्टसाक्सन राजे.
|
इ. स. ८०२—८३९
एग्बर्ट
ह्याचा अंमल सर्व इंग्लिश रयामनीवर होता.
|
इ. स. ८३९—८५८
एथेल्वूल्फ.
|
- इ. स. ८५८—८६० एथेल्बाल्ड.
- इ. स. ८६०—८६६ एथेल्बर्ट.
- इ. स. ८६६—८७१ पहिला एथेलरेड.
- इ. स. ८७१—९०१ आल्फ्रेड धि ग्रेट.
  - इ. स. ९०१—९२५ एड्वर्ड धि एल्डर (वडील).
    - इ. स. ९२५—९४० आथेल्स्टन.
    - इ. स. ९४०—९४६ पहिला एड्मंड.
    - इ. स. ९४६—९५५ एड्रेड.
  - एथेल्फ्लेड, मर्शियाची लेडी (बाई).

नार्थंब्रिया—आंग्लिया—मर्शिया

इ. स. ५४७
आइडा.
|
इ. स. ६१७—६३३
एड्विन
हा ख्रिस्तीधर्मी असून अधिराज होता.

|
इ. स. ६२७—६५५
पेन्डा
हा मूर्तिपूजक होता.
|
इ. स. ७५७—७९५
आफ्फा.

एड्वुड्.

इ. स. ९५९–९७५
एड्गर धि पीसबल (शांतिप्रिय)

इ. स. ९७५–९७९
एड्वर्ड धि मार्टर.
(आपल्या धर्माकरितां प्राण देणारा).

इ. स. ९७९–१०१६
एथेल्रेड धि अनरेडि.
(नानयार).

इ. स. १०१६
एड्मंडआयर्न साइड. ह्यानें
अवघे सातच महिने राज्य केले.

एड्वर्ड.
(देशपार केलेला).

एड्गर एथेलिंग.

मार्गरेट.
ही स्काटलंडच्या तिसऱ्या
माल्कमाची बायको.

एडिथ ऊर्फ माटिल्डा ही
इंग्लंडच्या पहिल्या
हेन्रीची बायको.

डानिश राजे.

इ. स. १०१६–१०३५
कॅनूट.

इ. स. १०३५–१०४०
पहिला हारल्ड.

इ. स. १०४०–१०४२
हार्थाकॅनूट.

इ. स. १०६६
दुसरा हारल्ड हा
अर्ल गाड्वुइनाचा पुत्र.
ह्याला वुइटान (बुधजनमंडल) ह्यानें ता. ५ जानुअरी
रोजीं निवडून राजा नेमिले.
तो ता. १४ अक्टोबर रोजीं
हेस्टिंग्स एथील लढाईंत ठार
मारला गेला.

इ. स. १०४२–१०६६
एड्वर्ड धि कन्फेस्सर.
(स्वधर्मार्थ दुःखभोगी).

परंतु त्या **एड्वुइनाच्या** अमलाखालीं असलेल्या राजांपैकीं, **मर्शियाचा पेंडा** नांवाचा राजा हा एवढा एक मोठा चुळबुळ्या होता. **पेंडाचे** प्रजाजन ह्यांची अद्यापि आपल्या प्राचीन देवांवर भक्ति होती. त्यानें त्यांना त्या **ख्रिस्ती**धर्मी राजावर चिथवून उठविलें, आणि **वेल्श**राजांपैकीं **काड्वाल्लन** नांवाचा एक राजा होता, त्याला आपणाला मिळण्याविषयीं प्रवृत्त करून त्यानें **एड्वुइनाशीं** युद्ध मांडलें. **एड्वुइन** इ० स० ६३३ त उत्तरेकडील मुलुखांत **हीथफील्ड** एथे लढाई झाली तींत ठार मारला गेला. नंतर **नार्थंब्रिया** आणि **मर्शिया** ह्या दोहों राज्यांच्या दरम्यान फार दिवसपर्यंत झगडा मातला. तो **पेंडाच्या** साऱ्या आयुर्मर्यादेभर एकसारखा चालू होता. तो **पेंडा** इ० स० ६५५ त ठार मारला गेला, तोंपर्यंत लढाया आणि चकमकी ह्यांनीं लोक फार त्रस्त झाले होते, आणि शेवटीं **मर्शियांतील** लोक हळू हळू **ख्रिस्ती** झाले.

पेंडा नांवाच्या राजाशी चाललेला झगडा, ६३३ पासून ६५५ पर्यंत.

एड्वुइन ठार मारला गेला तेव्हां, **पालिनुस** आणि त्याचे अनुयायी **नार्थंब्रियांतून** पळून गेले होते, परंतु तेथें प्रवृत्तींत आलेला तो नवीन **ख्रिस्ती** धर्म रक्षण करण्यासाठीं दुसरे मिशनरी (पाद्री) लोक आलेले होते. **आइरिश** लोकांकरवीं ह्या काळाच्या शंभर वर्षे पूर्वी, **सेन्ट पाट्रिक** ह्यानें **ख्रिस्ती** धर्म धेवविलेला होता, आणि **कोलम्बा** नांवाच्या एका **आइरिश मंकानें** (जोग्यानें) **स्काटलंडच्या पश्चिम किनाऱ्याच्या** लगत **इओना** नांवाच्या लहानशा खडकाळ बेटावर **मिशनरी** (पाद्री) लो-

आइरिश मिशनें म्हणजे धर्मप्रसारार्थ पाठविलेलीं पाद्रींचीं मंडळें इंग्लंडांत आलीं, ६३४—६६४.

कांकरितां एक ठाणें बांधविलें. तेथून **इंग्लंड**च्या उत्तरेकडील सर्व मुलुखांत धर्मोपदेशक जाऊं लागले. **मान्ट्रोझ**चा **मंक** (जोगी) **कथबर्ट** हा **नार्थंब्रियन** लोकांत पायांनीं भटकत असे तो, आणि आमचा **इंग्लिश** भाषेंत काव्य करणारा आदिकवि **सीड्मन**, (हा मूळचा *व्हिट्बी* एथील गाईपाळणारा धनगर होता) हे दोघे ह्या **आइरिश मंकां**च्या तालमींत तयार झालेले होते. त्या **आइरिश मंकां**नीं त्या काळच्या लोकांमध्यें चांगलें काम केलें. असें असतां इ० स० ६६४ त **रोमन मिशनरी** (पाद्री) लोक, व हे **आइरिश मंक** (जोगी), ह्यांच्या दरम्यान धर्मसंबंधी गोष्टींविषयीं कांहीं वाद उत्पन्न झाले, आणि **नार्थंब्रिया**चा राजा **आस्वि** ह्यानें त्यांचा निकाल **रोमन** धर्मोपदेशकांच्या तर्फे केला. तेव्हां बहुतेक **आइरिश मंक** स्वदेशीं परत गेले. आणि त्यांचें तें धर्मप्रसाराचें काम **रोम** एथून आलेल्या जोग्यांनीं आणि बिशपांनीं आपल्या हातीं घेतलें. तदनंतर **पोपानें टार्ससचा थिओडोर** ह्याला **कांटर्बरी** एथील **आर्चबिशप** नेमून पाठविलें. त्यानें बिशपांच्या **सीझ**, म्हणजे धर्माधिकारप्रांत ह्यांच्या मर्यादा ठरवून दिल्या; आणि प्रत्येक खेड्यांत, किंवा पांच चार खेड्यांच्या समुदायांत, एकेक प्रीस्ट (धर्मोपदेशक) नेमिला. ह्या धर्मोपदेशक असलेल्या प्रत्येक खेड्याला, किंवा पांच चारांच्या समुदायाला, त्या काळीं प्रथमच **पारिश** असें म्हणूं लागले असावे असें फारकरून दिसतें. **इंग्लंड**च्या उत्तरेकडील भागाकरितां **यार्क** एथें एका **आर्चबिशपा**ची पुढें नेमणूक केली. ह्या प्रकारें नेमिलेले आर्चबिशप, बिशप, आणि प्रीस्ट, हे मूट नांवांच्या सभांत

इंग्लिश लोकांतील धर्माधिकारव्यवस्था झाली, ६७३.

अधिकारपरत्वें वसत, आणि लोकांचा राज्यकारभार चालविण्याच्या कामांत अंशभाक् होत.

पुढें **मानस्टरिझ,** म्हणजे मंकांस राहण्याकरितां मठ, त्वरेनें बांधले जाऊं लागले. तेव्हां मंक (जोगी) त्या अडदांड स्वतंत्र लोकांमध्यें काईम वस्ती करून राहूं लागले, आणि त्यांना त्यांनीं निवांतपणें काम करण्यास, आणि विद्येला मान देण्यास शिकविलें. सुतार आणि इतर कारिगर व उदमी हे, **मानस्टऱ्यांच्या** व **आबी** (आबट नांवाचे महंत राहण्याकरितां मठ) ह्यांच्या भोंवतीं घरेंदारें बांधून वस्ती करून राहूं लागले. **आबींच्या** वेशींपुढें बाजार भरूं लागले. ह्या प्रकारें लहान लहान शहरवजा गांवें वसून वाढूं लागलीं.

शहरांची मूळ उत्पत्ति.

पहिला **इंग्लिश** इतिहास लिहिणारा **बीड** ह्यानें, **डर्हेमच्या** किनाऱ्यावरील **जारों** एथील मठांतच आपलें सर्व आयुष्य घालविलें, आणि तेथें त्यानें अनेक परदेशीयांशिवाय सहाशें विद्यार्थ्यांस शिकवून तरबेत केलें. त्यानें

बीड,६७३–७३५.

एकंदर ४५ ग्रंथ लिहिले. ते सारे **लाटिन** भाषेंत रचिलेले होते. त्यांपैकीं कांहीं त्याच्या शिष्यांकरितां पारिभाषिक ग्रंथ होते; कांहीं **बाइबल** म्हणून जें ख्रिस्ती धर्मपुस्तक आहे त्यावर अनुवादक टीका ग्रंथ होते; आणि एक, '**इंग्लिश** शाईचा किंवा रयासतीचा धर्मसंबंधी इतिहास' ह्या नांवाचा विख्यात ग्रंथ होता. त्या धर्मसंबंधी इतिहासांत, **आगस्टाइन** येऊन **केंट** प्रांताच्या किनाऱ्यावर उतरला, तेव्हांपासून पुढें दीडशें वर्षांत काय काय झालें तें सविस्तर सांगितलेलें आहे. **बीड** ह्याचा स्वभाव मोठा मायाळू आणि सोशीक होता, आणि एकीकडे त्याकाळचे परोपरीचे छोटेखानी राजे अधिकाधिक ऐश्वर्याकरितां